दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३०६ | शुक्रवार, दि.२८ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये




**संपादकीय**

## जयंत पाटलांची चूळबूळ : संशयाचे मळभ गडद

बावनकुळे–जयंत पाटील भेटीनंतर राजकीय वर्तुळात अनेक तर्क–वितर्क लावले जात आहेत. या भेटीनंतर जयंत पाटील भाजपात प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटीनंतर जयंत पाटील हेही शरद पवार गटाला सोडचिठ्ठी देतील अशा प्रकारच्या चर्चांना उधाण आले आहे.

### शेतीपूरक ई-वाहनामुळे शेतकऱ्यांना होणार लाभ

# महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरणात इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, पॉवर टिलर व कटरचा समावेश

### ना.पंकजा मुंडे यांच्या पुढाकाराने पर्यावरण विभागाने घेतला निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्य शासनाने आपल्या इलेक्ट्रिक वाहन धोरणात एक महत्त्वपूर्ण बदल केला आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी आता इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, पॉवर टिलर आणि कटरचा समावेश महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरणात केला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना शेती कामासाठी आवश्यक असलेल्या या ई वाहनांचा उपयोग करणे सोपे होणार आहे. पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या पुढाकाराने हा महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.**



ईलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि वातावरणातील प्रदूषण कमी करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण जाहीर केले होते. मात्र, सुरुवातीला या धोरणात शेतकऱ्यांसाठी उपयुक्त असलेल्या इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, पॉवर टिलर आणि कटरचा समावेश नव्हता. त्यावर विचार करून, मंत्री पंकजा मुंडे यांनी या



वाहनांचा समावेश धोरणात केला आहे. यासंबंधीच्या शासन निर्णयाचे शुद्धिपत्रक



आज काढण्यात आला आहे. शेतकऱ्यांसाठी फायदेः शेतीकामांसाठी ईलेक्ट्रिक वाहनांचा वापर केल्यास शेतकऱ्यांचा इंधनावरील खर्च कमी होईल आणि पर्यावरणावर होणारा नकारात्मक प्रभावही कमी होईल. यामुळे वातावरणातील वायू प्रदूषणात घट होईल आणि शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या देखील फायदा होईल. याशिवाय, इलेक्ट्रिक वाहने जास्त वेळ चालतात, कमी देखभाल खर्च होतो आणि ऊर्जा वापरामुळे कमी इंधनाची आवश्यकता आहे.

पान २ वर

## मुख्यमंत्र्यांनी घेतला १०० दिवसांच्या कार्यक्रमाचा आढावा

**मुंबई । प्रतिनिधी**



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या उपस्थित १०० दिवसांच्या कार्यक्रमाचा अंतरिम आढावा घेण्यात आला. आतापर्यंत केलेल्या चांगल्या कामाचा यामध्ये आढावा घेण्यात आला.**

७ जानेवारी ते १६ एप्रिल २०२५ या कालावधीत जी कामे झाली आणि होणार आहेत त्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. या बैठकीला मंत्रालय सचिवांपासून ते क्षेत्रीय अधिकाऱ्यांपर्यंत ६८५४ अधिकारी ऑनलाईन उपस्थित होते. ऑनलाईन बैठकीला सर्व स्तरातील इतके अधिकारी उपस्थित असण्याचा हा एक विक्रम आहे. तालुका स्तरापर्यंत अधिकाऱ्यांचीही यावेळी उपस्थिती होती. दरम्यान, यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना विविध सूचना दिल्या आहेत. नावीन्यपूर्ण उपक्रमांची यादी तयार करा, त्या इतरांनाही सांगा, अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. गुंतवणूक येत असताना गुड गव्हर्नन्स द्या, संपूर्ण कालावधीचा आढावा आल्यानंतर १ मे रोजी याचा सार्वजनिक कार्यक्रम करु असेही फडणवीस म्हणाले. यावेळी लक्षणीय कामगिरी करणाऱ्या १५ अधिकाऱ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आली.

# सीआयडीकडून दीड हजार पानांचे आरोपपत्र दाखल

### संतोष देशमुख हत्या, पवनचक्की खंडणी प्रकरणाचा जलदगतीने खटला चालवला जाण्याची शक्यता





**बीड । प्रतिनिधी**

**संतोष देशमुख हत्या, ॲट्रासिटी आणि पवनचक्की खंडणी प्रकरणी सीआयडीकडून जवळपास दीड हजार पानांचे आरोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणातील आरोपपत्र हे मुदतीपुर्वीच दाखल केल्याने आणि उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नेमणूक झाल्याने आता संतोष देशमुख खून प्रकरणाचा खटला जलदगतीने चालविला जाण्याची शक्यता आहे.**

सरपंच संतोष देशमुख खून प्रकरण संपुर्ण राज्यात गाजले असून जागोजागी मोर्चे काढण्यात आले. देशमुख कुटुंबाला

पान २ वर

### काय आहे आरोपपत्रात?

संतोष देशमुख हत्या प्रकरणात पोलिस प्रशासनातील काही अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केली का आणि दोषी आहेत का याचेही सत्य सीआयडीच्या तपासातून समोर येणार. या प्रकरणाशी संबंधित असलेल्या कुणाकुणाची चौकशी झाली हे देखील दोषारोप पत्र मधून समोर येणार. वाल्मिक कराडने खंडणी प्रकरणातून जमा केलेल्या संपत्ती संदर्भातील माहिती देखील समोर येण्याची शक्यता. वाल्मिक कराड, सुदर्शन घुले यांच्या संघटित गुन्हेगारीचे आणखी काही प्रकार घडले होते का? तसेच आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी यासंदर्भातही आरोप पत्रात सविस्तर माहिती. डिजिटल पुरावा मधून या प्रकरणाशी संबंधित असलेल्या आणि सीडीआर मधून या प्रकरणाशी कुणाकुणाशी संपर्क झाला हे देखील सत्य समोर येऊ शकते. वाल्मिक कराडचा संतोष देशमुख हत्या प्रकरणातला सहभाग आणि त्याचे पुरावे. सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करणारे सात आरोपींनी कशाप्रकारे हात त्याचा कट रचला आणि हत्या केली याचे पुरावे. या हत्याकांडामध्ये कुणाकुणाचा सहभाग आहे याचा तपास. संतोष देशमुख यांच्या हत्येचा मूळ कारण समोर येणार. खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड आणि विष्णू चाटे यांचा संतोष देशमुख हत्या प्रकरणातील सहभाग आहे का याचाच तपास समोर

### सुरेश धसांनी घेतला हा निर्णय

संतोष देशमुख कुटुंबासोबत असल्याचे सुरुवातीपासून सांगत हा लढा यशस्वीरित्या आ. सुरेश धस यांनी लढला. आता त्यांनी मोठा निर्णय घेतला असून जोपर्यंत देशमुख कुटुंबाला न्याय मिळत नाही तोपर्यंत सत्कार न स्विकारणार नसल्याचे सांगितले आहे. गुरुवारी त्यांनी परांडा येथे जाहीर कार्यक्रमात सत्कार नाकारला.

### “मुदत असताना आरोपपत्राची घाई कशी?–खा. सोनवणे

संतोष देशमुख खून प्रकरणासह इतर दोन प्रकरणाचे आरोपपत्र सिआयडीने दाखल केले. यात मुदत असताना अगोदर दाखल केल्याने नेमका प्रकार काय आहे, हे समजत नाही. घटला जलदगतीने चालवण्यासाठी ही घाई केली असेल तर ठिक आहे. मात्र काही मुद्द वगळून घाईगडबडीत आरोपत्र दाखल केले असेल तर ते बरोबर नाही, अशी प्रतिक्रिया खा. बजरंग सोनवणे यांनी दिली आहे.

## अक्षय शिंदेचा एन्काऊंटर बनावट असल्याचा मुद्दा कसा वगळला?

### उच्च न्यायालयाचा ठाणे सत्र न्यायालयाला सवाल, राज्य सरकारलाही फटकारले





**मुंबई । प्रतिनिधी**

अक्षय शिंदेचे एन्काऊंटर बनावट असल्याचा ठपका ठेवत संबंधित पोलिस अधिकाऱ्यांच्या भुमिकेवर सवाल उठवणारे अहवालातील दोन परिच्छेद कसे वगळले जाऊ शकतात? असा प्रश्न विचारत हायकोर्टाने ठाणे सत्र न्यायालयाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हे प्रकरण हायकोर्टात सुरू आहे याची ठाणे सत्र न्यायाधीशांना कल्पाना दिली होती का? असा सवालही हायकोर्टाने राज्य सरकारला विचारला.

दंडाधिकारीऱ्यांनी सादर केलेल्या अहवालातील दोन प्रमुख मुद्दे कसे काय स्थगित केले जाऊ शकतात? असा सवाल विचारण्यात आला आहे. ५ मार्चच्या पुढील सुनावणीत राज्य सरकारने यावर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश हायकोर्टाने दिले आहेत. याशिवाय याप्रकरणी ज्येष्ठ वकील मंजुला राव यांची अमायकस क्युरी म्हणून नियुक्ती करण्याचे आदेश

पान २ वर

## ‘बालरोग तज्ञ परिचारिका’ अभ्यासक्रमाला जे.जे.हॉस्पिटलनंतर बीड जिल्हा रुग्णालयात मान्यता

### आ.संदीप क्षीरसागरांनी मानले शासनाचे आभार

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रात वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत २० विद्यार्थी प्रवेश क्षमता असेलला केवळ जे.जे.रुग्णायालय मुंबई येथे उपलब्ध असलेला नर्सिंग क्षेत्रातील ’पोस्ट बेसिक डिप्लोमा इन पेडियाट्रिक नर्सिंग’ आ.संदीप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्यामुळे ३० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचा अभ्यासक्रम आता बीड जिल्हा रुणायालात उपलब्ध होणार आहे. बीड जिल्हा रुग्णालयातील परिचर्या प्रशिक्षण केंद्रात हा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी शासनाकडून मान्यता मिळाली आहे. त्यामुळे माता व नवजात बालक यांच्या आरोग्यसेवेत महत्वाची भूमिका बजावणाऱ्या बालरोगतज्ञ परिचारिका मुंबईनंतर आता मुंबईपेक्षा जास्त संख्येने बीडमधून घडणार आहेत. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांनी पालकमंत्री, आरोग्यमंत्री व महाराष्ट्र शासनाचे आभार मानले आहेत.**



केंद्र शासन व राज्य शासन यांच्याकडून कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत माता व बाळ मृत्यू दार कमी करण्यासाठी तसेच नवजात बालक व माता यांचे आरोग्यमान उंचावण्यासाठी समुपदेशन, उपचार व प्रशिक्षण यांच्या माध्यमातून प्रशिक्षित अधिपरिचारिकांकडून आरोग्य सेवा पुरविण्यात येतात. सध्या महाराष्ट्र राज्यात वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत २० विध्यार्थी क्षमता असलेला ’पोस्ट बेसिक डिप्लोमा इन पेडियाट्रिक नर्सिंग’ हा अभ्यासक्रम

पान २ वर

## वक्फ विधेयकातील प्रस्तावित बदलांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

केंद्रीय मंत्रिमंडळाने वक्फ विधेयकातील प्रस्तावित बदलांना मान्यता दिली आहे. येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात हे विधेयक संसदेत मांडले जाऊ शकते, अशी माहिती सूत्रांनी दिली. वक्फ विधेयकात व्यवस्थापन करणाऱ्या केंद्रीय आणि राज्य वक्फ बोर्डांचे नियमन करणाऱ्या कायद्यांमध्ये ४४ बदल प्रस्तावित आहेत. केंद्र सरकार अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात संसदेत सुधारित विधेयक सादर होण्याची शक्यता आहे.

वक्फ विधेयकाबाबत केंद्रीय मंत्रिमंडळाने संयुक्त संसदीय समितीने म्हणजेच जेपीसीने केलेले १४ बदल स्वीकारले आहेत. अलिकडेच, विरोधकांनी जेपीसी अहवालाबाबत प्रश्न उपस्थित केले होते. त्यामध्ये त्यांनी सुचवलेल्या बदलाचा समाविष्ट नसल्याचा आरोप केला होता. अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी ऑगस्ट २०२४ मध्ये लोकसभेत वक्फ विधेयक सादर केले. यानंतर ते जेपीसीकडे पाठवण्यात आले होते. जेपीसीमध्ये

पान २ वर

## स्वारगेट प्रकरणाला एसटीची खासगी सुरक्षा कारणीभूत, कदमांकडून पोलिसांची पाठराखण

**पुणे । प्रतिनिधी**

स्वारगेट डेपोतून फलटणला निघालेल्या तरुणीवर मंगळवारी (दि.२५ फेब्रुवारी) पहाटे अत्याचार करण्यात आला. या प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे हा फरार झाला असून त्याला शोधून देणाऱ्यास १ लाख रुपयांचे बक्षीस देणार असल्याची घोषणा पोलिसांकडून करण्यात आली आहे. परंतु आरोपी अद्यापही फरार आहे. पण येत्या काही तासांमध्ये आरोपीला अटक करण्यात येईल, असे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडून सांगण्यात आले आहे. तर या प्रकरणाला एसटीची खासगी सुरक्षा कारणीभूत असल्याचे म्हणत मंत्री योगेश कदमांनी पोलिसांची पाठराखण

पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२२ फेब्रुवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १३०.०० क्विंटल | २,८०२ | ३,३५८ | ३,२११ |
| ज्वारी/हायब्रिडः १३६.००क्विंटल | १,८०० | ३,६५० | २,४०४ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : ४३.५० क्विंटल | ७,००१ | ७,३८१ | ७,१७१ |
| उडीद : ७.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |
| बाजरी: ११.०० क्विंटल | २,३०० | ३,३०४ | २,८४३ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ७.०० क्विंटल | ३,६०० | ४,००० | ३,८४३ |
| हरभरा:५.५० क्विंटल | ५,२६० | ५,३०० | ५,२८० |

# राज्यातील लाडक्या गायींच्या पालनपोषणासाठी दररोज द्यावे लागणार ३७ लाख

### महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडून होणार योजनेची अंमलबजावणी



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील देशी गायींना राज्यमाता–गोमाताचा दर्जा देण्यात आल्यानंतर राज्य सरकारकडून त्यांच्या पालनपोषणासाठी प्रति गाय दररोज ५० रुपये अनुदान दिले जाणार आहे. त्यासाठी शासनाने राज्यातील नोंदणीकृत गोशाळांमधून अर्ज मागवले होते. त्यामध्ये सुमारे १,०६,७३४ गोधनांची संख्या आढळून आली असून, त्यापैकी ७५,५९२ देशी गोमाता आहेत. त्यामुळे लाडक्या गोमातेच्या परिपोषणासाठी राज्य सरकारला येत्या अर्थसंकल्पात प्रतिदिन ३७ लाख ७९ हजार ६०० रुपये खर्चाची तरतूद करावी लागणार आहे.

### राज्यस्तरीय समितीकडून मिळणार मान्यता

सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेंतर्गत सन २०२४–२५ या वर्षासाठी राज्यातील एकूण १६८ तालुक्यांतून गोशाळांना अनुदानासाठी ३९ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी ३४ अर्ज पात्र ठरले आहेत. आयोग स्तरावरील छाननी पूर्ण झाली असून मान्यतेसाठी हे प्रस्ताव राज्यस्तरीय समितीपुढे ठेवण्यात आले आहेत, असे सांगण्यात आले.

राज्यात एकूण १०६८ कार्यरत संस्था आहेत. गोसेवा आयोगाकडे नोंदणीसाठी ९३५ संस्थांचे अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ८५८ संस्थांची नोंदणी झालेली आहे. ३३ संस्था अपात्र ठरल्या आहेत. देशी गायींचे संगोपन, संवर्धन आणि पालनपोषण करण्यास प्रोत्साहन मिळावे तसेच गोशाळांना अत्यल्प उत्पन्न असल्याने त्यांना आर्थिकदृष्ट्या बळकटी मिळावी यासाठी गोशाळांमधील देशी गायींच्या पालनपोषणाच्या माध्यमातून प्रतिदिन प्रति गाय ५० रुपये अनुदान योजना राबवण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला

पान २ वर

अग्रलेख

# जयंत पाटलांची चूळबूळ : संशयाचे मळभ गडद

बावनकुळे-जयंत पाटील भेटीनंतर राजकीय वर्तुळात अनेक तर्क-वितर्क लावले जात आहेत. या भेटीनंतर जयंत पाटील भाजपात प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटीनंतर जयंत पाटील हेही शरद पवार गटाला सोडचिठ्ठी देतील अशा प्रकारच्या चर्चांना उधाण आले आहे.

अजित पवार यांनी वेगळा निर्णय घेऊन भाजपसोबत जाण्यापूर्वीच जयंत पाटील भाजपमध्ये जाणार अशी चर्चा होती. याचे कारण जयंत पाटील आणि अजित पवार यांच्यात अनेक मुद्यांवरून मतभेद होते. मात्र अजित पवार यांनी शरद पवारांची साथ सोडल्यानंतर जयंत पाटील यांच्याकडे पक्षाची सूत्रे आली. आता जामखेडचे आमदार रोहित पवार आणि जयंत पाटील यांच्यात खटके उडत असल्याचे बोलले जात आहे. बीडमधील सरपंच हत्या प्रकरण, परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरण, पवारांच्या हस्ते एकनाथ शिंदेंचा सत्कार, महायुती सरकारमधील धुसफूस अशा अनेक घडामोडी राज्यात होत असताना राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील कुठे आहेत असा सवालही केला जात होता. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अस्वस्थ असलेल्या जयंत पाटलांनी सोमवारी मध्यरात्री भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर शेखर बावनकुळे यांची भेट घेतली म्हणे. यासंबंधीची बातमी मराठी माध्यमांनी फोडल्यानंतर जयंत पाटलांनी भेटीची कबुली दिली. परंतु त्याचे कारण वेगळे होते असे ते म्हणाले. शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस फुटल्यानंतर जयंत पाटलांनी शरद पवार यांच्याबरोबरच राहणे पसंत केले. कारण त्यांना अपेक्षित असलेले जलसंपदा खाते भाजपने सोडले नाही अशा बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. परंतु आता जयंत पाटील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये खूपच अस्वस्थ आहेत. कारण त्यांचे बाकीचे सगळे सहकारी भाजपच्या सत्तेच्या वळचणीला जाऊन दीड वर्ष होत आले तरी जयंत पाटलांच्या हाती मात्र काहीच लागले नाही अशी चर्चा आहे. जयंत पाटील ज्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आहेत त्या शरद पवारांच्या राष्ट्रवादीतच त्यांच्या विरोधात वातावरणनिर्मिती होत राहिली. या पार्श्वभूमीवर जयंत पाटील कधीही भाजपमध्ये प्रवेश करू शकतात अशा बातम्या माध्यमांमध्ये रंगल्या होत्या. त्यात जयंत पाटील यांच्याच गोटातून हवा देण्यात आली होती. कारण जयंत पाटील जे करतील ते आम्हाला मान्य असेल अशा प्रतिक्रिया त्यांच्या समर्थकांनी माध्यमांकडे व्यक्त केल्या होत्या.

जयंत पाटलांनी बावनकुळे यांची भेट घेतली पण ही भेट गुप्तच राहिली. ही बातमी मराठी माध्यमांनी फोडल्यानंतर मात्र जयंत पाटील यांनी त्या भेटीचा खुलासा केला. सांगली जिल्ह्यातल्या महसूल कामासंदर्भात बावनकुळे यांची भेट घेऊन त्यांना काही निवेदने दिली. या वेळी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि राष्ट्रवादीचे कार्यकर्ते माझ्याबरोबर होते. आमच्यामध्ये कुठलीही राजकीय चर्चा झाली नाही असे जयंत पाटील म्हणाले. परंतु बातमी फुटल्यानंतरच जयंत पाटील यांनी खुलासा केल्यामुळे त्यांच्या भोवती जमा झालेले संशयाचे मळभ अधिकच गडद झाले. जयंत पाटील हे माझी अधिकृत वेळ घेऊन भेटण्यासाठी आले होते. त्यामुळे ही आमची कोणतीही राजकीय भेट नव्हती. तसेच आमच्यात कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही. फक्त विकास कामासंदर्भात आमची चर्चा झाली. त्यांचे काही मुद्दे महत्त्वाचे होते, ते मी मार्गी लावण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यांच्या राजकीय भविष्याबाबत बोलण्याएवढा मी मोठा नाही असे स्पष्टीकरण चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे.

गत काही वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकारणाचा बट्ट्याबोळ उडाला आहे. एका बाजूला काही तुकडे, दुसऱ्या बाजूला उरलेले तुकडे एकत्र आले. हे झाले मोठ्या नेत्यांचे स्वहितासाठी केलेले राजकारण. काही तुकडे हेलकावे खात आहेत, कधी इकडे तर कधी तिकडे. मूळ पक्षांचे सच्चे, कच्चे, स्वार्थी कार्यकर्त्यांचे काय झाले हा प्रश्न आहे. स्वार्थी कार्यकर्ते कुठूनही स्वतःचा स्वार्थ साधतात. कच्चे कार्यकर्ते कच्चेच राहतात. त्यांना कोणीही विचारत नाही. पण सच्चे कार्यकर्ते आज कोठे आहेत? त्यांची स्थिती अवघड झाली आहे. धनुष्यबाणातून अनेक जुने बाण निघून गेले आहेत. घड्याळाचीही तीच अवस्था आहे. तास काटा एका बाजूला तर मिनिट काटा दुसऱ्या बाजूला. आज कोणत्याच पक्षात पक्षनिष्ठा ही औषधालाही उरलेली नाही. जो तो स्वतःचा स्वार्थ साधण्यात गुंतला आहे. सच्चेपणा लयाला गेला आहे. समाजकारण बाजूला ठेवून स्वार्थ साधण्यासाठी प्रत्येकाचे पळा पळा कोण पुढे पळतो असे सुरू आहे.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगारतून ५८ उमेदवारांची निवड

**जालना । प्रतिनिधी**

**जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्यावतीने हुतात्मा जनार्दन मामा नागापुरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत मंगळवार दि.२५ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा घेण्यात आला. मेळाव्यात ५८ उमेदवारांची निवड करण्यात आली.**

पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे उदघाटन आमदार अर्जुन खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी जिल्हा व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण अधिकारी अतुल केसकर होते तर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या उपप्राचार्य रजनी शेळके, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. मेळाव्यात मुलाखतीतून उमेदवारांची विविध पदासाठी प्राथमिक निवड केली. यात नवभारत फर्टिलायझर्स एल.एल.पी. छत्रपती संभाजीनगर १४, युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी प्रा. लि. मुंबई १०, परिनिका न्युरोकेअर हॉस्पीटल १०, एस.बी.आय. लाईफ इन्शूरन्स १३ , ओम साई राम स्टील अलॉइज १० , टी.के. प्रिसीजन प्रा.लि. छत्रपती संभाजीनगर १, अशा एकुण ५८ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. याठिकाणी आणासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालय जालनामार्फत तीन लाभार्थ्यांना ट्रॅक्टरचे वाटप आ. अर्जुन खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्वयंरोजगार करण्यास इच्छूक उमेदवारकरिता शासनाचे विविध महामंडळाचे स्टॉल उभारून लाभार्थ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्याबाबतची सविस्तर माहिती देण्यात आली. मेळाव्यात सूत्रसंचालन डॉ. अमोल परिहार यांनी केले तर आभार सुरेश बहुरे यांनी मानले. मेळाव्यासाठी कौशल्य विकास रोजगार विभागाचे कौशल्य विकास अधिकारी भुजंग रिठे, अमोल बोरकर, प्रदीप डोळे, आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे श्री कापसे,

# वाळू माफियाने दुसरा काम धंदा बघा नाहीतर तडीपार करणार-अप्पर पो अधीक्षक नोपानी



**जालना । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील वाळू माफियांनी दुसरा काहीतरी काम धंदा बघा नाहीतर तडीपार करणार असा गंभीर इशारा अप्पर पोलीस अधीक्षक श्री आयुष नोपानी यांनी दिला.**

जालना जिल्हा पोलिस अधिक्षक २७ फेब्रुवारी रोजी पोलिसांनी वाळू माफियांची परेड घेतली. जालना जिल्ह्यातील आणि भोकरदन मधील सुमारे ३० वाळू माफियांकडून पोलिसांनी बांधपत्र भरून घेतले. यावेळी जालन्याच्या पोलिस अधीक्षक कार्यालयात अप्पर पोलीस अधीक्षकांनी वाळू माफियांना सज्जड दम देत अवैध वाळू चोरी, वाहतूक व वाळू उपसा तातडीने थांबवण्याच्या सूचना केल्या आहेत. पुन्हा जर अवैधरित्या वाळू उपसा आणि वाळू वाहतूक केल्यास तडीपार करण्यात येईल असा इशाराही पोलिस अधीक्षकांनी दिला. जालना आणि भोकरदन मधील सुमारे ३० वाळू चोरी, वाहतूक असे गुन्हे असणार्या आरोपींना अचानक पोलिस अधीक्षक कार्यालयात बोलावून घेतल्याने वाळू माफियांत एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, आता पर्यंत वाळू चोरी आणि वाहतूक करणार्या १० वाळू माफियांना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलं असून त्यांच्यावर विविध कलमान्वये कारवाई करण्यात आलीय. तसेच इतर वाळू माफियांनी काहीतरी दुसरा काम धंदा करा नसता स्वतः तडीपार व्हा नाहीतर पोलीस प्रशासनाकडून तडीपार करण्यात येईल असा रोखठोक इसारा वाळू माफियाला देण्यात आला. त्याच अनुषंगाने जर पुन्हा वाळू माफियांनी अवैध वाळू चोरी किंवा वाहतूक केल्यास त्यांच्यावर पर प्रतिबंधक कारवाई करण्याचा इशारा पोलिस अधीक्षकांनी दिला. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी, प्रशिक्षणार्थी पोलिस उपअधीक्षक करिश्मा चौधरी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक पंकज जाधव, पोलिस निरीक्षक संदीप भारती, पोलिस निरीक्षक सुरेश उनवणे यांच्यासह पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

# गायरान जमिनी नावे करण्यासाठी लढा उभा करणार-आझाद क्रांती सेना

वडवणी । प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्यातील गायरान वहीती जमिनी प्रशासनाने तात्काळ नावे करून गायरानधारकांना सातबारा द्यावा या मागणीसाठी आझाद क्रांती सेनेच्या वतीने मोठा लढा उभा करणार येणार असल्याचे जाहीर केले आहे. आज दिनांक २७-०२-२०२५ रोजी वडवणी शहरांमध्ये आझाद क्रांती सेनेची बैठक संपन्न झाली या बैठकीमध्ये गायरान जमिनीसह विविध प्रश्नावर चर्चा झाली. या बैठकीमध्ये आझाद क्रांती सेनेच्या कवडगाव सर्कल प्रमुख पदी दत्ता गायकवाड यांची एकमताने निवड करण्यात आली यावेळी अरुण आव्हाड,मंगेशराव शिंदे, लक्ष्मण आव्हाड, बळीराम मस्के, अंकुशराव आडगळे,अशोकराव लोंढे, सुरेश लोंढे,दत्ताभाऊ गायकवाड, दशरथ कुचेकर, ता अध्यक्ष महादेव आव्हाड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.**

गायरान जमिनीवरील निर्बंध तात्काळ हटवण्यात यावेत व गायरान जमिनी वहिती व ज्या ताब्यात आहेत त्या तात्काळ नावे करून सातबारा देण्यात यावा असे आवाहन या बैठकीमध्ये आझाद क्रांती सेनेचे वडवणी तालुका अध्यक्ष महादेव आव्हाड यांनी केले आहे. वडवणी येथे आझाद क्रांती सेना ता प्रमुख महादेव भाऊ आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीमध्ये प्रमुख्याने वडवणी तालुक्यातील हजारो एकर जमीन कसत असलेल्या गायराण धारकांच्या नावे होण्यासाठी आधीक तीव्र लढा आझाद क्रांती सेनेच्या वतीने देण्यात येणार आहे अशी ग्वाही ता प्रमुख महादेव भाऊ आवाड यांनी दिली. या बैठकीत सर्व आंबेडकरी चळवळीतील व आझाद क्रांती सेनेचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. ज्या जमिनीवरती करून खात असलेल्या त्या जमिनी गिळंकृत करण्याचा डाव राज्य सरकारचा व केंद्र सरकारचा असून हा डाव हाणून पाडण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व गायरान धारक एक होऊन हा लढा देतील असा इशाराही आझाद क्रांती सेनेच्या वतीने देण्यात आला आहे. या राज्यामध्ये व देशामध्ये महागाईचे संकट, विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप मिळत नाही, अनेक योजना मागासवर्गीयांच्या बंदच आहेत, नोकर भरती बंद आहे, गायरान जमिनीवर लवादा सारखे प्रकल्प आणून गायरान धारकांना धुळीस मिळवण्याचा सरकारचा डाव आहे. हा डाव नक्कीच गायरान धारण व दलितांच्या वतीने हाणून पाडल्या जाईल असा इशारा आझाद क्रांती सेनेच्या वतीने देण्यात आला आहे. या बैठकीला दलित संघटनेतील विविध क्षेत्रातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. लवकरच याबाबतीत प्रसिद्धी पत्रक काढून त्यावर निर्णय घेतला जाईल असे मत आझाद क्रांती सेनेचे तालुका अध्यक्ष महादेव आव्हाड यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले आहे.



# कडा सह जामगाव वाळुंज तवलवाडी पांढरी येथे छावा चित्रपट पाहण्यासाठी तोबा गर्दी..

**आष्टी । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित 'छावा' चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला आहे. शंभूराजेंच्या बलिदानाची महती सर्वसामान्य व ग्रामीण भागातील नागरिकांना समजली जावी यासाठी छावा चित्रपट हा सर्वत्र दाखविण्यात येत आहे आला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

प्रारंभी छत्रपती संभाजी महाराज यांची आरती करत फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. मागील काही दिवसापासून छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर चित्रपट प्रदर्शित झाला असून त्याला संपूर्ण महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. छत्रपती संभाजी महाराजांचे नेतृत्व, शौर्य आणि बलिदान यासह महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा चित्रपटाद्वारे जगासमोर आला आहे. छत्रपती संभाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत असून, महाराष्ट्र आणि देशाच्या इतिहासात त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. महिला,शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना छत्रपती संभाजी महाराजांचा आदर्श घेता यावा, महाराजांच्या इतिहासाबद्दल अधिक जागृती व्हावी यासाठी छावा हा हिंदी चित्रपट दाखवला आहे.हा चित्रपट दाखवण्यासाठी गांवकरी सरपंच युवा कार्यकर्ते पुढाकार घेत आहेत.

# पोलिसांच्या संयुक्त कारवाईने बेलगाम वाहनधारक ताळ्यावर

## उपविभागीय पोलिस अधिकारी, ठाणे प्रभारी, आसीपी, वाहतुक शाखेच्या धडक मोहिमेत १० लाखांचा दंड वसूल

**बीड। प्रतिनिधी**

पोलिस अधिक्षक म्हणून नवणीत काँवत यांनी पदभार घेतल्यापासून जिल्ह्यात अवैध धंद्यांचे कंबरडे मोडले आहे. मात्र दुसरीकडे बेलगाम वाहनधारक हे सुसाट होते. गुरुवारी पोलिसांच्या संयुक्तरित्या राबवलेल्या धडक मोहिमेमुळे बेलगाम वाहनधारक ताळ्यावर आले आहेत. यावेळी पोलिसांनी चलान वसुली मोहिमेअंतर्गत १०२८ चलन फाडून ८ लाख २० हजार ५५० रुपये तर २३७ केसेस करुन १ लाख ४७ हजार दंड आकारण्यात आला आहे.



संतोष देशमुख खून प्रकरणानंतर पोलिस अधिक्षक म्हणून नवणीत काँवत यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी पदभार घेतल्यावर जिल्ह्यातील पोलिस यंत्रणेला अगोदर शिस्त लावली. त्यानंतर त्यांनी अवैध धंद्यांकडे आपला मोर्चा वळवला. त्यामुळे सध्या जिल्ह्यात अवैध धंदे बंद असल्याचे चित्र आहे. काँवत यांनी काही दिवसापुर्वीच जिल्ह्यातील गुन्हेगारांना बोलवून तंबी दिली. त्यामुळे गुन्हेगारांचे चांगलेच धाबे दणाणले आहे. आता पोलिस अधिक्षक नवणीत काँवत आणि अप्पर पोलिस अधिक्षक सचिन पांडकर, चेतना तिडके यांनी बेलगाम वाहनधारकांविरोधात मोहिम हाती घेतली असून चलान वसुली मोहिम अंतर्गत जिल्ह्यात सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी, सर्व ठाणे प्रभारी, वाहतुक शाखा, आरसीपी यांनी संयुक्तरित्या धडक मोहिम राबवली. जिल्ह्यातील पाडळसिंगी टोल नाका, केज टोलनाका, चुंबळी फाटा, धारुर टोलनाका, बर्दापुर टोलनाका, माजलगाव-परभणी टी पाईंट, परळीतील ईटके कॉर्नर, आंभोरा चेकपोस्ट आदी ठिकाणी ही मोहिम राबवून वाहतुक चलान वसुलीचे ८ लाख २० हजार ५५० रुपये रोख वसुल करण्यात आले. तसेच २३७ केसेस करुन १ लाख ४७ हजार दंड आकारण्यात आला आहे. पोलिसांच्या या संयुक्त कारवाईमुळे बेलगाम व नियम न पाळणाऱ्या वाहनधारकांना चांगलीच चपराक बसली आहे.

# पान १ वरून...

### महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरणात

महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरणानुसार, बॅटरीवरील वाहनांची खरेदी करणाऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे. या योजनेचा फायदा आता शेतकऱ्यांना इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, पॉवर टिलर आणि कटर खरेदी करतांना होईल. राज्य सरकारने यासंबंधीचा शासन निर्णय आजच जारी केला आहे. या धोरणामुळे फक्त शेतकऱ्यांना फायदे होणार नाहीत, तर पर्यावरण व वातावरणीय बदलाचा प्रभावही कमी होईल. इलेक्ट्रिक वाहने प्रदूषण कमी करण्यास मदत करतील, ज्यामुळे स्वच्छ हवा मिळवता येईल. याशिवाय, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये इलेक्ट्रिक वाहने वापरण्याची आवड निर्माण होईल, जेणेकरून पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाची स्वीकृती वाढेल. या धोरणामुळे महाराष्ट्र राज्यात शेतीच्या कामामध्येही इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढेल आणि शेतकऱ्यांना अधिक सुलभ आणि किफायतशीर साधने मिळतील, असे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

---------

### सीआयडीकडून दीड हजार

न्याय मिळावा यासाठी सर्वस्तरातून नागरीक पुढे आले. त्यामुळे सरकारवरही दबाव वाढल्याने अगोदर सीआयडी नंतर एसआयटी आणि पुढे न्यायालयीन चौकशीचे आदेश सरकारने दिल्याने तपासाला सुध्दा वेग आला. संतोष देशमुख खून प्रकरण, खंडणी प्रकरण आणि अ‍ॅट्रोसिटी प्रकरणाचा तपास पुर्ण झाल्याने सीआयडीने गुरुवारी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. यावेळी सीआयडीचे अतिरिक्त महासंचालक बसवराज तेली आणि एसआयटीचे प्रमुख किरण पाटील न्यायालयात उपस्थित होते. आता सरपंच हत्येचा खटला कोर्टात चालणार असून, विशेष सरकारी वकील उज्वल निकम हे हा खटला लढवणार आहेत. त्यामुळे या तिनही प्रकरणाचा निकाल लवकर लागेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

-------------

### 'बालरोग तज्ञ परिचारिका' अभ्यासक्रमाला

केवळ मुंबई येथील जे.जे.रुग्णालय येथील परिचर्या प्रक्षिशण केंद्रात उपलब्ध होता. त्यानंतर आता जे.जे.रुग्णायलय येथील प्रशिक्षण केंद्रापेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश क्षमतेने या अभ्यासक्रमाला बीड जिल्हा रुग्णालयाच्या परिचर्या प्रशिक्षण केंद्रात सुरू करण्यासाठी मान्यता मिळाली आहे. महाराष्ट्रात मुंबई नंतर बीड मध्ये बालरोगतज्ञ असलेल्या अधीपरिचारिका घडणार हि नक्कीच बीड जिल्ह्यासाठी भूषणावह बाब आहे. दरम्यान हा अभ्यासक्रम १ वर्ष कालावधीचा असून ३० विद्यार्थी प्रतिवर्षी येथे प्रवेश घेऊ शकतील. तसेच या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याकरिता जीएनएम किंवा बीएस्सी नर्सिग उत्तीर्ण नोंदणीकृत अधिपरिचारिक असणे आवश्यक आहे. याबाबत दि.२७ फेब्रुवारी २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून शासन निर्णय क्रमांक २०२५०२२७१४४४१३३१७ द्वारे अधिसूचित करण्यात आले आहे. बालरोग तज्ञ अधिपरिचारिका अभ्यासक्रमाला बीड जिल्हा रुग्णालयातील परिचर्या प्रशिक्षण केंद्रात मान्यता मिळावी यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी शासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. त्याला आता अखेर यश आले आहे. बीड मतदार संघाच्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांनी पालकमंत्री ना.अजित दादा पवार, आरोग्यमंत्री प्रकाशराव आबिटकर यांचे व महाराष्ट्र शासनाचे आभार मानले आहेत.

-------------

### अक्षय शिंदेचा एन्काऊंटर बनावट

हायकोर्टाने दिले आहेत. दंडाधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालात अक्षय शिंदे एन्काऊंटर बनावट असल्याचा निर्वाळा देत संबंधित पोलिस अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले होते. राज्य सरकारने सीआयडी चौकशी सुरू असल्याने अद्याप संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर अक्षय शिंदेच्या हत्येचा गुन्हा नोंदवलेला नाही. तसेच अण्णा शिंदे यांनी याप्रकरणी आता खटला चालवायचा नसल्याचे सांगितले आहे. या मुद्यांवर अमायकस क्युरी हायकोर्टाला मदत करणार आहे. बदलापूरमधील आरोपी अक्षय शिंदेचा एन्काऊंटर बनावट असल्याचे न्यायालयीन समितीने अहवालात म्हटले आहे. या बनावट चकमकीतील ५ पोलीस कर्मचाऱ्यांनी आपल्या बळाचा गैरपद्धतीने वापर केला. त्यामुळे हे पाच पोलीस कर्मचारी अक्षय शिंदे याच्या मृत्यूसाठी जबाबदार आहेत, असे संबंधित अहवालात नमूद करण्यात आले आहे. बनावट एन्काऊंटरप्रकरणी अद्याप पोलिसांवर गुन्हा का नोंदवलेला नाही? असा सवाल हायकोर्टाने उपस्थित केला होता. या प्रकरणाची सीआयडीकडून स्वतंत्र चौकशी सुरू आहे. तसेच या प्रकरणाची आयोगामार्फत समांतर चौकशीही सुरू आहे. त्यामुळे या प्रकरणात तातडीने कारवाई करण्यात कायदेशीर अडचणी आहेत असा युक्तिवाद विशेष सरकारी वकिलांनी हायकोर्टात केला होता.

------------

### स्वारगेट प्रकरणाला एसटीची खासगी सुरक्षा

केली आहे. गुरुवारी (दि.२७ फेब्रुवारी) मंत्री योगेश कदम यांनी स्वारगेट बस डेपोतील घटनास्थळाचा आढावा घेतला. यावेळी पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार सुद्धा तिथे उपस्थित होते. ज्यानंतर मंत्री कदम यांनी पत्रकार परिषद घेऊन या घटनेबाबत गुप्तता का ठेवण्यात आली? याची माहिती सुद्धा पत्रकार परिषदेच्या माध्यमातून देण्यात आली. प्रसार माध्यमांशी संवाद साधताना गृहराज्य मंत्री योगेश कदम म्हणाले की, स्वारगेट अत्याचार प्रकरण हे दुर्दैवी आहे. मात्र घटनेची माहिती लवकर मिळाली असती तर आरोपीला लवकर पकडता आले असते. संभाव्य लोकेशन न मिळवता थेट आरोपीला अटक करण्यात आली असती. लवकर बातमी बाहेर आली असती तर आरोपीला लांब पळून जाता आले नसते. घटना लपवून ठेवण्याचा प्रकार झालेला नाही. मात्र गुप्तता पाळण्यात आली आहे. जी या केसमध्ये गरजेची होती. आरोपी हा लवकरच पकडला जाईल, असा विश्वास मंत्री कदम यांनी व्यक्त केला आहे. पोलिसांची पथके आरोपीच्या मागावर आहेत. कोणत्याही प्रकारचा आरडाओरडा न झाल्यामुळे आजूबाजूच्या लोकांना याबाबत कळून आले नाही. बसच्या आजूबाजूला १० ते १५ लोक होते. मात्र आरडाओरड न झाल्यामुळे आरोपीला क्राईम सुरळितपणे करता आला. एसटी महामंडळाकडून खासगी सुरक्षा घेण्यात आली आहे. पोलिसांमार्फत गस्त घालण्यात येत आहे. या प्रकरणावेळी देखील गस्त घालण्यात आली असून यामध्ये पोलिसांकडून दुर्लक्ष झाल्याचे म्हणता येणार नाही. प्रायव्हेट सिक्युरिटी असताना त्यांनी सुरक्षा दिली नाही ही बाब नक्कीच दिसून येत आहे. त्यावर काम करणे आवश्यक आहे, असे यावेळी योगेश कदम यांनी सांगितले. स्वारगेट आवारामध्ये अवैध धंदे आणि अत्याचाराच्या घटना होत असल्याचे समोर येण्याबाबत माध्यमांनी प्रश्न केला यावर गृहराज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, स्वारगेट आगारामध्ये आता ज्या ठिकाणी घटना घडली आहे त्या ठिकाणी पोलिसांनी आता पर्यंत जवळपास ७ हजारांहून अधिक कारवाया केल्या आहेत. या एका वर्षामध्ये केलेल्या कारवाया आहेत. यामध्ये लहानपासून मोठ्यापर्यंत सर्व कारवाया आहेत. त्यामुळे पोलिसांचे दुर्लक्ष आहे असे म्हणता येणार नाही. फक्त गाडीतून नाही तर खाली उतरून प्रत्यक्ष गस्त घातली जात आहे. अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली.

------------

### वक्फ विधेयकातील प्रस्तावित

भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांचे १६ खासदार होते, तर विरोधी पक्षांचे १० खासदार होते. ६५५ पानांचा हा अहवाल फेब्रुवारीच्या सुरुवातीला संसदेच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात आला. भाजप खासदार जगदंबिका पाल आणि संजय जयस्वाल यांनी लोकसभेत जेपीसी अहवाल सादर केला होता. त्यांनी संयुक्त समितीसमोर दिलेल्या पुराव्यांची नोंदही सभागृहाच्या पटलावर ठेवली. मेधा कुलकर्णी यांनी राज्यसभेत जेपीसी अहवाल सादर केला. संसदीय समितीने बहुमताने अहवाल स्वीकारला, जरी समितीतील विरोधी पक्षांच्या सर्व ११ खासदारांनी अहवालावर आक्षेप घेतला होता. त्यांनी असहमती नोट्स देखील सादर केल्या होत्या. जेपीसी अहवाल सभागृहात मांडला गेला तेव्हा बराच गोंधळ झाला होता.

**वक्फ विधेयकाच्या अंमलबजावणीमुळे असे बदल होतील**

या विधेयकानुसार आता वक्फ मालमत्तेची नोंदणी जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात अनिवार्य करण्याचा प्रस्ताव आहे. यामुळे मालमत्तेचे मूल्यांकन करता येईल. या कायद्याच्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर वक्फ मालमत्ता म्हणून ओळखली गेलेली किंवा घोषित केलेली कोणतीही सरकारी मालमत्ता वक्फ मालमत्ता मानली जाणार नाही. एखादी मालमत्ता वक्फ मालमत्ता आहे की सरकारी जमीन हे ठरवण्यासाठी जिल्हाधिकारी मध्यस्थ असतील. त्यांचा निर्णय अंतिम असेल. एकदा निर्णय घेतल्यानंतर जिल्हाधिकारी महसूल नोंदींमध्ये आवश्यक बदल करू शकतात आणि राज्य सरकारला अहवाल सादर करू शकतात. विधेयकात असेही म्हटले आहे की, जोपर्यंत जिल्हाधिकारी राज्य सरकारला त्यांचा अहवाल सादर करत नाहीत तोपर्यंत अशी मालमत्ता वक्फ मालमत्ता म्हणून गणली जाणार नाही.

-------------

### राज्यातील लाडक्या गायींच्या

आहे. महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडून योजनेची अंमलबजावणी केली जाणार आहे. या योजनेसाठी गोसेवा आयोगाकडून ऑनलाइन अर्ज मागवण्यात आले होते. सदर योजनेंतर्गत आयोगाकडे ६५२ ऑनलाइन अर्ज प्राप्त झाले होते. प्राथमिक छाननीमध्ये ६१२ अर्ज पात्र झाले, तर त्रूटी पूर्ततेसाठी ३६ अर्ज परत करण्यात आले आहेत. या योजनेंतर्गत गोशाळेत किमान ५० गोवंश असणे आवश्यक आहे. गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोरक्षण संस्था या अनुदानासाठी पात्र ठरणार आहेत. गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेअंतर्गत १४८ गोशाळांना १८६७.७१ लाख निधी वितरित करण्यात आला आहे. या अनुदानातून गोशाळांनी दुग्धोत्पादनास शेतीकामास पशुपैदाशीस ओझी वाहण्याच्या कामास उपयुक्त नसलेल्या किंवा असलेल्या गाय वळ व बैल व वय झालेले गोवंश यांचा सांभाळ करावयाचा आहे. पशुधनासाठी चारापाणी व निवाऱ्याची सोय उपलब्ध करून द्यावयाची आहे.

-------------

# आदर्श शिक्षक शामराव थोरात गुरुजींच्या जीवनकार्यावर गौरव ग्रंथ प्रकाशन सोहळ्याचे आयोजन

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मौजे मांगवडगाव येथील रहिवाशी असणारे शामराव थोरात गुरुजी हे समाजासाठी एक आदर्श व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांचे योगदान विशेषतः ग्रामीण शिक्षण, सामाजिक सुधारणा आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी उल्लेखनीय राहिले आहे.त्यांनी



नालंदा शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणाच्या प्रसारासाठी काम केले आणि अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने त्यांनी कार्यरत राहून समता, बंधुता आणि सामाजिक न्याय यांचे मूल्य रुजवण्याचा प्रयत्न केला. राजकीय स्तरावरही त्यांनी समाजहितासाठी योगदान दिले.अशा थोर व्यक्तिमत्त्वाच्या जीवनकार्यावर गौरव ग्रंथ प्रकाशित होत असेल, तर ते एक महत्त्वाचे दस्तऐवजीकरण ठरेल.

कालकथित शामराव थोरात गुरुजी यांच्या जीवनावर प्रकाश टाळण्यासाठी गौरव समितीचे अध्यक्ष डॉ. अशोक मुजमुले सचिव डॉ. ओमप्रकाश नायर व अॅड सचिन थोरात यांनी पुढाकार घेऊन गौरव ग्रंथ प्रकाशीत करण्याचे ठरवले आहे . दिनांक २ मार्च २०२५ वार रविवार रोजी फुलेनगर येथील जे.के. फंक्शन हॉल येथे हा प्रकाशन सोहळा संपन्न होणार असून सदरील प्रकाशन सोहळ्यास उपस्थित रहावे असे आवाहान आयोजकाकुन करण्यात आले आहे.

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार, दि. २८ फेब्रुवारी २०२५



# पोकरा योजनेमध्ये ग्राम कृषी विकास व ग्राम कृषी संजीवनी समिती रद्द करा - वंचित बहुजन आघाडी

बीड । प्रतिनिधी

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पपोकरा ही योजना महाराष्ट्र सरकारच्या कृषी विभागाने राबवली आहे.हवामान बदल आणि दुष्काळ यामुळे शेतकऱ्यांना होणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी ही योजना राबवण्यात आली आहे.यामधे लाभार्थी शेतकऱ्याची निवड करण्यासाठी ग्रामपंचायतच्या माध्यमातून ग्राम कृषी संजीवनी समीती स्थापन करण्यात येते. या समितीमध्ये सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, प्रगत शेतकरी, अनुसूचित जातीतील एक सदस्य, महिला बचत गट प्रतिनिधी असे कार्यकारी सदस्य या समितीमध्ये असतात. तसेच अकार्यकारी समितीमध्ये कृषी सहाय्यक, ग्रामसेवक इत्यादी अधिकारी यामध्ये समाविष्ट असतात परंतु सरपंच हे विशिष्ट समूहाचे लोक,शेतकरी व नातलग घेतली जातात. त्यामुळे या योजनेमधून सर्व शेतकरी बांधवांना सर्वसमावेशक लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नाही. या योजनेमधून शेतकऱ्यांना वैयक्तिक लाभ मिळावा यासाठी ही योजना अखली जात आसून



ग्रामपंचायतचा ठरावाची गरज भासत नसताना ग्राम कृषी विकास/ग्राम कृषी संजीवनी समीतीच्या आडून अनुसूचित जातींच्या लाभार्थ्यांना डावलले जात आहे. गावपातळीवरील राजकीय हेवेदावे तसेच जातीय समीकरण यातून निर्माण झालेले विविध समूहाचे गट यामुळे अनू. जाती व जमातीच्या लाभार्थ्यांना ग्रामसभेचा ठराव मिळविणे जिकरीचे जाते. भारतीय समाज हा जातीय व्यवस्थक असल्यामुळे गावातील राजकारणामध्ये अनु. जाती व जमातीच्या समुहाला दुय्यम वागणूक देण्यात येते. कोणत्याही योजनेचा लाभ देण्यासाठी गावातील पुढारपण करणारे नेतृत्व मी तुम्हाला लाभ मिळवून देतो अशी उपकाराची व वर्चस्वाची भावना ठेवतो त्यामुळे या समूहाला अंकित ठेवण्यासाठी गावपातळीवर ग्रामसभेचा वापर केला जातो. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, महासचिव खंडू देवराव जाधव, सहसंघटक अर्जुन जवंजाळ, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कवठेकर, पुरुषोत्तम नारायणराव वीर, तालुकाध्यक्ष किरण वाघमारे, मिलिंद सरपते, देवा गव्हाणे यांनी निवेदन दिले.

गावपातळीवरील राजकीय हेवेदावे व जातीय समीकरण यामुळे अनुसूचित जातीचे लाभार्थी वंचित

शासनाच्या निकषाप्रमाणे शेतकरी वैयक्तिक लाभासाठी पात्र ठरूनही ग्राम पातळीवरील राजकरण, जातिव्यवस्था, सामाजिक समीकरणे यामुळे शेतकरी लाभापासून वंचित ठेवण्याचे प्रकार ग्राम कृषी विकास/ग्राम कृषी संजीवनी समिती मार्फत पुढारलेल्या समूहाकडून केले जातात या पेक्षा ऑनलाईन प्रणालीचा वापर करून लाभार्थी निवड करावी ग्राम कृषी विकास समिती/ग्राम कृषी संजीवनी समिती रद्द करावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने जिल्हा कृषी अधिकारी सुभाष साळवे यांच्याकडे करण्यात आली आहे.

अजय सरवदे, जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी (प)

# सप्तेश्वराची पांढर म्हणून पाटोदा शहराची ओळख

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहर हे अतिशय प्राचीन शहर आहे याठिकाणी तेराव्या शतकातील संगमेश्वर महादेव मंदिर. या प्राचीन पुरातन. वास्तु सह महादेवाची एकूण सात ठिकाणी



पाटोदा शहरात.आहेत. व एक. गुप्तेश्वर. महादेवाचे स्थान अदृश्य रूपात आहे. असे एकूण सात ठिकाणी आहेत. सप्तेश्वराची पांढर म्हणून सुद्धा पाटोद्याची ओळख आहे. म्हणून पाटोदा शहराला शिवभक्ती व शिव महिमा. चा पाटोदा शहराला धार्मिक वारसा आहे. महाशिवरात्रीनिमित्त आज सर्व महादेवाची मंदिरे गर्दीने हाउसफुल झाले. सर्व मंदिरे आज गर्दीने हाउसफुल झालेली दिसली. पाटोदा येथे संगमेश्वराचे मंदिर. शालिवाहन राजाच्या काळात बाराव्या तेराव्या शतकात. संगमेश्वराचे मंदिर बांधले आहे. असा दावा पुरातत्व विभागाने केला आहे. पाटोदा शहरात असलेल्या अदृश्य प्राचीन शिवस्थानापैकी ग्रामदैवत एक असलेले. भामेश्वर संगमेश्वर नगरेश्वर तीर्थेश्वर बेलेश्वर लिंगेश्वर गुप्तेश्वर इत्यादी शिवमंदिरे पाटोदा शहरात आढळतात. मांजरा व मांजरा नदीच्या काठी असलेले संगमेश्वर शिवमंदिर. पावसाळ्यात मंदिराच्या गाभाऱ्यात पाणी शिरते. जुन्या काळी पाटोदा शहराला भामाचे पाटोदा असे नाव होते. पडदा शहरातील सर्व शिवमंदिरे. जागृत देवस्थाने म्हणून ओळखले जातात. संगमेश्वराचे मंदिर हेमाडपंथी बांधकाम आहे.



**बीड: वसंतराव नाईक अधिकारी, कर्मचारी संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी अर्जुन चव्हाण उपाध्यक्षपदी राजेशकुमार राठोड, बी. टी. पवार, सचिवपदी आबासाहेब राठोड, सहसचिवपदी विजय चव्हाण, कार्याध्यक्षपदी जगन्नाथ चव्हाण यांची निवड करण्यात आली.**

# महाराष्ट्र शासन कृषि विज्ञान केंद्र खामगांव तर्फे कृषीमित्र बाबु कोकाट यांचा सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र खामगाव व महाराष्ट्र शासन कृषि विभाग गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२४ फेब्रुवारी रोजी पी.एम.किसान सन्मान निधी योजनेच्या १९ व्या हप्त्याचे वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होत. या मध्ये के,व्ही,के, व कृषी विभाग यांच्या मार्फत प्रगतीशील शेतकरी आणि शेतकरी बंधूंसाठी उत्कृष्ट काम करणारे शेतकरीमित्र यांचा सन्मान करण्यात आला या मध्ये ठाकर आडगाव येथील संध्या मल्टी सर्विसेस चे संचालक कृषीमित्र बाबु (त्रिंबक) कोकाट यांनी कृषी क्षेत्रातील केलेल्या कामाबाबत त्यांचा सन्मान करण्यात आला कोकाट यांनी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजने मधील शेतकरी बांधवांची ई,केवायसी करण्यासाठी कृषी विभाग यांना खूप मोठा प्रमाणात मदत केलेली आहे.गेवराई तालुक्यातील बऱ्याच शेतकरी बंधू यांचे प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजने मधील खाते हे सुरवातीला शेतकऱ्यांनी ई,केवायसी न केल्यामुळे इनऍक्टिव्ह झाले होते त्या शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ मिळण्यासाठी त्यांना ई,केवायसी करावी लागणार होती त्या साठी बाबु कोकाट यांनी जातेगाव मंडळा मधील पेंडिंग राहिलेल्या शेतकरी यांचे ई,केवायसी करण्यासाठी कृषी विभाग यांना मदत केली त्यामुळे शेतकरी या योजनेपासून वंचित राहू शकणार नाहीत याची काळजी कृषिमित्र बाबु कोकाट यांनी गेवराई कृषी विभागाच्या मदतीनं घेतली.या कामाची दखल घेत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र खामगाव व महाराष्ट्र शासन कृषि विभाग गेवराई यांचा मार्फत संध्या मल्टी सर्विसेस ठाकर आडगाव चे संचालक कृषीमित्र बाबु कोकाट यांना बीड चे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मा.श्री सुभाष साळवे साहेब,

केव्हीके खामगावचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. हनुमान गरुड साहेब,यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.एक वेळी उपस्थित गेवराई तालुका कृषी अधिकारी श्री.अभय वडकुते साहेब,तंत्र अधिकारी श्री हर्षवर्धन खेडकर,जातेगाव मंडळाधिकारी कु.अश्विनी म्हस्के मॅडम,अभियांत्रिकी विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. तुकेश सुरपाम साहेब, कृषी पर्यवेक्षक श्री.पवार साहेब, कृषी पर्यवेक्षक श्री देशमुख साहेब,कृषी सहाय्यक श्री वाघमारे साहेब यांचे तसेच शेतकरी बांधव श्री अजय कोकाट, महेश कोकाटे,कांताराम जाधव प्रख्यात कवी समाधान सम्राट व सर्व शेतकरी बांधव यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# मोदी लर्निंग सेंटर येथे मराठी राजभाषा गौरव दिन उत्साहात साजरा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मोदी लर्निंग सेंटरच्या श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू व्हिजन पब्लिक स्कूल अंबाजोगाई येथे कविवर्य कुसुमाग्रज यांची जयंती आणि मराठी राजभाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . याप्रसंगी शालेय विद्यार्थ्यांनी शाळेचा मूल्य शिक्षणाचा परिपाठ मराठी भाषेतून सादर केला . संगीत समूहाने मराठी भाषेचे गौरव गाणारे गीत सादर केले तसेच मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त शाळेत मराठी हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली.



या स्पर्धेत इयत्ता चौथी ते नववी पर्यंतचे विद्यार्थी सहभागी झाले होते. इंग्रजी माध्यमाची शाळा व विद्यार्थी असताना देखील अतिशय उत्कृष्ट अशा प्रकारच्या उत्तम हस्ताक्षरांचा नमुना या सहभागी विद्यार्थ्यांच्या स्पर्धेतून दिसून आला . प्रत्येक वर्गाच्या विजेत्या स्पर्धकांना प्रथम , द्वितीय व तृतीय अशा प्रकारची बक्षीस व प्रमाणपत्र देण्यात आली. संस्थेचे प्राचार्य रेंजु आर चंद्रन यांनी सर्व विद्यार्थ्यांना व मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्यांना मराठी राजभाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संस्थेचे सचिव राजकिशोर मोदी , कार्यकारी संचालक संकेत मोदी , संस्थेचे मार्गदर्शक वसंतराव चव्हाण , मार्गदर्शक प्राचार्य डी. एच. थोरात , मार्गदर्शक बी. आय खडकभावी यांनी उपस्थित सर्व विद्यार्थी , शिक्षक ,पालकांना शुभेच्छा दिल्या.

# चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा

बीड । प्रतिनिधी

मंगळवार दि. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी रामचंद्र संस्थान चे मठाधिपती रामानंद महाराज भारती, मा. श्री. चंद्रकांत शेळके साहेब (तहसीलदार बीड), मा.श्री. शिवाजी बंटेवाड साहेब (पोलीस निरीक्षक - बीड ग्रामीण) मा.श्री. समंदर खान साहेब (गटशिक्षणाधिकारी. पं.स. बीड, मा.श्री. गणेश बहिर सर (केंद्र प्रमुख राजुरी नवगण) व अविनाश आहेर,डॉ.नारायण पांडुळे सर सर्व जिल्हा परिषद शिक्षक, वग्रामस्थ व तिप्पटवाडी, मुर्शदपुर, रूईलिंबा, लिंबारूई शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या व बजरंगबली प्रतिष्ठानचे सर्व सहकारी उपस्थित पार पडला.

पान ६ वरून...

## सांघिक खेळातून आत्मविश्वास

शारीरिक क्षमता वाढवतात. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात एका तरी खेळात सराव करून पारंगत झाले पाहिजे कारण, शिक्षण माणसाचं जीवन समृद्ध करतात तर एखादी कला क्रीडा कौशल्य जीवनात आनंदाणे कस जगायचं ते शिकवतात असे प्रतिपादन डॉ इंगोले यांनी केले. सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.संजीव बंटेवाड यांनी आपल्या मार्गदर्शनपर मनोगतात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी कला क्रीडा कौशल्य अत्यावश्यक आहेत. अंबाजोगाई कृषी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व घडविण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहू ही ग्वाही दिली. यावेळी जिमखाना उपाध्यक्ष डॉ.रवींद्र चव्हाण, डॉ.राजू महाजन, डॉ.विजयकुमार जाधव, डॉ.सुहास जाधव, डॉ.वैभव कांबळे, प्रा.सुनील गलांडे, डॉ.संजय राठोड, डॉ.योगेश वाघमारे, प्रा.परमेश्वर वाकडे, बालासाहेब चिल्लगे, सतीश आंधळे, कवी राजेश रेवले, सतीश गुंडावार, अनिल खेडेकर तसेच महाविद्यालयातील अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. विठ्ठल जाधव यांच्या

बालभारतीचे किरण केंद्रे, साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त एकनाथ आव्हाड, साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या संगीता बर्वे, पत्रकार भाऊ तोरसेकर, चपराक प्रकाशनचे घनश्याम पाटील, शिक्षणतज्ज्ञ संदीप वाघचौरे, सरहद फाऊंडेशनचे संजय नहार यांचे हस्ते झाले. स्टोरीमिरर मुंबईचे रोशन म्हस्के यांनी कल्पक निर्मिती केली. याप्रसंगी महेश मोरे, देवीदास फुलारी, प्रा. किरण सगर, बापू दासरी, संतोष तांबे, संजीवनी जाधव, शैलजा कारंडे यांचेसह मान्यवर साहित्य रसिकांची उपस्थिती होती.

## मंगेश मुळी यांना आदर्श

केंद्र शासनाची संस्कृत विषयाची शिष्यवृत्ती मिळवून दिली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या अविरत या माध्यमिक शिक्षणासंदर्भातील प्रशिक्षणाचे राज्यस्तरीय तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून ही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. मुळी यांनी लिहिलेले वैचारिक लेख विविध वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाले आहेत. सध्या ते संस्कृत भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी संस्कृत भारती बीड जिल्हा प्रचारप्रमुख म्हणून कार्य करीत आहेत. मंगेश नारायणराव मुळी यांच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन गौरव करण्यासाठी दैनिक शिवजागर, विश्वनाथ फौंडेशन व इन्फ्रोडॅड यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार त्यांना जाहीर झाला आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मंगेश मुळी यांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, मित्र, परिवार, आप्तेष्ट, नातेवाईक यांच्याकडून अभिनंदन करण्यात येत आहे. आज शुक्रवार, दिनांक २८ फेब्रुवारी रोजी मा.मंत्री महोदय, लोकप्रतिनिधी, कलावंत, अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत व हस्ते एका भव्य, अविस्मरणीय सोहळ्यात या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.

## वडवणीत डिजेमुक्त ऐतिहासिक

नादमय ढोल ताशा ध्वजपथक, कोल्हापुर येथील युवक युवतींचे शिवकालीन युध्दकला खेळ पथक, धार्मिक कार्यक्रमांमध्ये पारंपारिक वारकरी वेशभूषामध्ये बाल वारकरी भजनी मंडळातील विविध खेळ, छत्रपती शिवाजी महाराजांचा मेघडंबरी राजमहाल आकर्षक देखावा, महाराष्ट्रातील अकलुज येथील प्रसिध्द हलगी पथक, अलंकार बॅन्जो, उंट, घोडे देखावा सादर करण्यात येणार आहेत. भव्य दिव्य मिरवणुकीमध्ये सहभागी महिला व युवक पुरुषांना फेटेधारी महिला मंडळ व फेटेधारी युवक मंडळ, संपूर्ण शहरामध्ये निरनिराळ्या कलरमध्ये फटाक्यांची आतिषबाजी, वडवणी शहरात विद्युत रोषणाई, लेझर शो लाईट यांसह आदी भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून डिजेमुक्त जयंती साजरी करण्यात येणार असून त्यामुळे यंदाचा हा शिवजन्मोत्सव सोहळा ऐतिहासीक ठरणार आहे. तरी या सर्व भरगच्च कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन वडवणी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीचे अध्यक्ष संतोष डावकर यांनी पत्रकार परिषदेत केले आहे. या पत्रकार परिषदेस नगराध्यक्ष शेषेराव जगताप, अमरसिंह मस्के, शिवाजी तौर, सचिव स्वप्निल मस्के, खजिनदार दत्तात्रय जमाले, उपाध्यक्ष बबलु शेळके, प्रसिद्धप्रमुख अविनाश मुजमुले, पांडुरंग कदम, सोमनाथ मस्के, सुरेश भोरे, प्रमेश्वर मस्के, हानुमंत शिंदे, सह आदी शिवजन्मोत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.मिरवणुकीचे आकर्षण :- वारकरी पथक, हलकी पथक, मावळा पथक, छत्रपती शिवाजी महाराजांचा मेघडंबरी राजमहाल आकर्षक देखावा, ढोल पथक, कोल्हापूरचे शिवकला पथक, अलंकार बॅन्जो, उंट,घोडे देखावा.

# भारत आणि बौद्धिक संपदा अधिकारावर यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

भारत आणि बौद्धिक संपदा या विषयावर अंबाजोगाई शहरातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रात सुप्रसिद्ध अर्थतज्ञ डॉ. सय्यद अझरुद्दीन, डॉ सय्यद महजबिन, मराठवाडा शिक्षण संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य दत्ता पाटील यांच्यासह आदीजण उपस्थित होते. अंबाजोगाई येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयांमध्ये वाणिज्य विभाग, ग्रंथालय विभाग, व विद्यार्थी विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न झाले. राष्ट्रीय चर्चासत्र साठी प्राप्त झालेल्या शोधनिबंध प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांनी मनोगत व्यक्त केले. बौद्धिक संपदा अधिकार याचा इतिहास आणि पार्श्वभूमी स्पष्ट केली. तसेच पेटंट बद्दलची माहिती दिली.

डॉ. सय्यद अझरुद्दीन यांनी जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेनंतर भारतात पेटंट आणि बौद्धिक संपदा अधिकार या बाबींना महत्व प्राप्त झाले. त्यातूनच उदारीकरण, जागतिकीकरण आणि खाजगीकरण या नव्या अर्थिक धोरणामधील मूल्यांना महत्व प्राप्त होवू लागले व भारत एक महासत्ता बनण्याच्या दिशेने प्रवास सुरू झाला. असे मत बीजभाषक डॉ.सय्यद अझरुद्दीन यांनी आपल्या बीजभाषणातून व्यक्त केले. डॉ. सय्यद महेजबीन यांनी बौद्धिक संपदा अधिकार या विषयावर मार्गदर्शन केले. बौद्धिक संपदा अधिकार ची सुरुवात , ते घेणं का आवश्यक आहे, नाविन्यपूर्ण, अनेक लोकांना पाहता आला पाहिजे, नवीन डिजाईन पाहिजे त्यासाठी कॉपीराईट घेणं का आवश्यक आहे अशा



विविध पैलूंवर विस्तृत मार्गदर्शन केले.माणसाचे विचार सगळ्यात मोठी शक्ती आहे. पेटंट कशाला मिळू शकते याबाबतची माहिती डॉ सय्यद महजबिन यांनी दिली. उद्योजक देशाला मजबुती प्राप्त करून देतात.इच्छाशक्ती,प्रामाणिकपणाशिस्त, आणि आत्मविश्वास उद्योजकता विकसित करण्यासाठी आवश्यक आहे. सिंगापूर, जर्मनी, चीन, भारत अमेरिका येथील उद्योजक्तेवर त्यांनी प्रकाश टाकत संधी शोधा म्हणजे यश प्राप्त होईल असे प्रतिपादन डॉ. महेजबीन सय्यद यांनी व्यक्त केले. चर्चासत्राच्या आपल्या अध्यक्षीय भाषणात दत्तात्रय आबा पाटील यांनी शिक्षण व्यवस्थेत शेतीविषयक ज्ञान दिले पाहिजे, भारत हा शेतीप्रधान देश असून शिक्षण व्यवस्था शेती विषयक ज्ञानावर, संशोधनावर भर दिला पाहिजे असे प्रतिपादन केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ, संयोजक डॉ. इंद्रजित भगत, डॉ. सुनील भोसले , उपप्राचार्य डॉ. रमेश शिंदे, मॉडर्न ज्वेलर्सचे, बाबासाहेब पाटील,नव उद्योजक कृष्णा तोडकर, मॉडर्न ज्वेलर्सचे मालक, प्रेरणा ड्रेसेसचे मालक विजय मार्चला यांची उपस्थिती होती.

पेपर सादरीकरण या सत्रात ३३ ऑनलाईन तर १६ पेपर ऑफलाईन स्वरुपात सादर करण्यात आले, त्यामध्ये ग्रंथपाल पांडुरंग गादेकर, डॉ. राजाभाऊ भगत, डॉ. बालाजी साबळे, प्रा. विक्रम धनवे, डॉ. प्रकाश रोडीया, डॉ. सावंत, कु.पूजा मुंडे अशा एकून ४९ पेपर लेखकांनी आपले पेपर सादर केले. महाविद्यालय विकास समितीचे सदस्य वसंतराव मोरे यांच्याकडून बेस्ट रिसर्च पेपर प्रेझेंटेशन साठी बेस्ट रिसर्च पेपर अवॉर्ड देण्यात आले.संशोधक विद्यार्थ्यांमधून पूजा मुंडे आणि फॅकल्टी मधून प्रा विक्रम धनवे याना उत्कृष्ठ शोधनिबंध वाचक पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले.

या परिषदेत राज्यभरातील आणि एकूणच देशातील विविध राज्यातील संशोधक विद्यार्थी ऑफलाईन स्वरुपात १६४ तर ऑनलाईनमधे १०० हून अधीक प्राध्यापक तथा संशोधक उपस्थीत होते. चर्चासत्राच्या समारोप समारंभामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . शिवदास शिरसाठ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर परिषदेचे आभार समन्वयक डॉ. इंद्रजीत भगत यांनी मानले. परिषदेच्या यशस्वीतेसाठी समन्वयक प्रा. भारत पल्लेवाड, ग्रंथपाल सुनील भोसले तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. चर्चासत्राच्या उद्घाटन सोहळ्याचे प्रास्ताविक संयोजक डॉ. इंद्रजित भगत यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री नागेश जोंधळे व कु. साक्षी शर्मा या विद्यार्थिनीने केले व आभार प्रदर्शन ग्रंथपाल सुनील भोसले यांनी केले.परिषदेची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.या परिषदेत राज्यभरातील आणि एकूणच देशातील विविध राज्यातील प्राध्यापक संशोधक ऑनलाइन बहुसंख्येने जॉईन झाले होते.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शुक्रवार दि.२८ फेब्रुवारी २०२५
४

# पंतप्रधान अन्न सूक्ष्म प्रक्रियेत संभाजीनगर पहिल्यास्थानी

## राज्यात २२ हजार प्रकल्पांना मंजुरी

पुणे : पंतप्रधान सूक्ष्म प्रक्रिया उद्योग योजनेतून गेल्या पाच वर्षांत राज्यात सुमारे २२ हजार लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. आतापर्यंतच्या अंमलबजावणीत छत्रपती संभाजीनगर पहिल्यास्थानी असून अहिल्यानगर दुसऱ्या, तर सांगली तिसऱ्या स्थानी आहे. तर, देशात महाराष्ट्र पहिल्यास्थानी असल्याचे सांगण्यात आले. सर्वाधिक चर्चेत असलेला बीड जिल्हा मात्र सर्वांत मागे आहे.

भांडवली गुंतवणुकीसाठी वैयक्तिक, गट लाभार्थी, सामाईक पायाभूत सुविधा, इनक्युबेशन सेंटर, मूल्य साखळी, स्वयंसहाय्यता गटाच्या सदस्यांना बीज भांडवल, मार्केटिंग व ब्रँडिंग आदी घटकांकरिता या योजनेतून अर्थसाह्य देण्यात येते. तीस लाख रुपये प्रकल्प किमतीच्या वैयक्तिक गट लाभार्थी सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना प्रकल्प किमतीच्या ३५ टक्के व जास्तीत जास्त १० लाख रुपये, तर सामाईक पायाभूत सुविधा, मूल्यसाखळी इनक्युबेशन केंद्र या घटकांसाठी प्रकल्प किमतीच्या ३५ टक्के व ३ कोटींपर्यंत अनुदान देण्यात येत आहे. या योजनेतून २०२०-२१ ते २०२४-२५ या पाच वर्षांच्या काळात सुमारे २२ हजार शेतकऱ्यांना प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. त्यात तृणधान्य उत्पादनाचे ४ हजार ३६९, मसाले उत्पादनाचे ३ हजार ५२२, भाजीपाला उत्पादनाचे ३ हजार २४२, कडधान्य उत्पादनाचे २ हजार ७२३, फळ उत्पादनाचे २ हजार १६०, दुग्ध उत्पादनाचे २ हजार ९९, तेलबिया उत्पादनाचे ८३०, पशुखाद्य उत्पादनाचे ५५३, तृणधान्य उत्पादनाचे ५२३, ऊस प्रक्रिया उत्पादनाचे ४४६, मांस उत्पादनाचे १२०, वन उत्पादनाचे ९८, लोणचे उत्पादनाचे ४१, सागरी उत्पादनाचे ३९ व इतर एक प्रकल्प मंजूर झाले आहे. यावर्षी (२०२४-२५) १२ हजार प्रकल्प मंजूर करण्याचे उद्दिष्ट होते. आतापर्यंत ५,६६६ प्रकल्प मंजूर झाले आहेत.



### देशात महाराष्ट्र अव्वल

पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगाच्या अंमलबजावणीत महाराष्ट्रात २२ हजार प्रकल्प मंजूर झाले असून, महाराष्ट्र राज्याने देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे. बिहार या राज्याने २१ हजार २४८ प्रकल्प मंजूर असून ते देशात दुसऱ्या स्थानावर तर उत्तर प्रदेश राज्याचे १५ हजार ४४९ प्रकल्प मंजूर असून ते तिसऱ्या क्रमांकावर आहे. या योजनेच्या माध्यमातून २ हजार २६३ कोटीची गुंतवणूक राज्यात झाली असून ३८९ कोटी रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे.

# नव्या फळबाग लागवडीपूर्वी मातीचे परीक्षण आवश्यक

नवी फळबाग लागवड करताना मातीच्या विविध घटकांचा विचार व पिकांची योग्य निवड या बाबी महत्त्वाच्या आहेत. तसेच शास्त्रीयदृष्ट्या योग्य पद्धतीने माती परिक्षण करून त्यांचे गुणधर्म तपासून मगच लागवडीचे नियोजन करणे गरजेचे आहे. नवी फळबाग लागवड करताना कोणतीही घाई करू नये.

नव्या लागवडीसाठी मातीचे गुणधर्म : ठरावीक फळझाडांची निवड किंवा नवी लागवड करण्यासाठी मातीचे भौतिक, रासायनिक गुणधर्म विचारात घेणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रयोगशाळेत जाऊन तपासणी करण्याची गरज नाही. यामध्ये खालील गुणधर्मांचा समावेश होतो. १. मातीची खोली: फळझाडांची मुळे जमिनीत खोलवर जात असल्यामुळे खोल मातीची जमीन असणे आवश्यक आहे. ही खोली कमीत कमी ९० सेंमी ते जास्तीत जास्त १२० सेंमी असणे आवश्यक आहे. २. मातीतील निचरा: मातीतून होणारा पाण्याचा निचरा उत्तम असणे आवश्यक आहे. तो चांगला होत नसल्यास अशा जमिनीत पावसाळ्यात पाण्याची पातळी जास्त कालावधीपर्यंत वर असते, त्यामुळे अन्नद्रव्यांचा पुरवठा नियमित होत नाही आणि मातीतून रोगांचा प्रादुर्भाव होतो. ३. मातीचा पोत : फळझाडे मध्यम ते भारी पोत असलेल्या चिकण, वालुकामय पोयटा किंवा पोयटा आदी विविध प्रकारच्या मातीत घेतली जातात. मात्र बहुतेक फळपिकांसाठी पोयटा किंवा वालुकामय पोयटा या प्रकारचा पोत असलेली माती सर्वोत्तम मानली जाते. ४. जमिनीचा उतार : फळबागेसाठी शक्यतो उंच-सखल जमिनीऐवजी सपाट जमीन निवडावी. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून सपाटीकरण आणि ठिबक सिंचन यासारख्या उपाययोजना करून व्यवस्थापन करता येते.

मातीचे रासायनिक गुणधर्म : १. मुक्त चुनखडीचे प्रमाण : हे प्रमाण फळबागेसाठी जमिनीची योग्यता ठरविण्याचा सर्वांत महत्त्वाचा गुणधर्म आहे. ज्या जमिनीत हे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा जास्त आहे त्या बहरासाठी ताण आवश्यक असणाऱ्या फळपिकांसाठी अयोग्य असतात. २. मातीचा सामू (पीएच) व आम्ल विम्ल निर्देशांक - फळपिकांसाठी ६.५ ते ८.५ या दरम्यान असणाऱ्या सामूची जमीन योग्य मानली जाते. अति आम्लधर्मी आणि अति विम्लधर्मी जमीन अनेक फळपिकांसाठी अयोग्य असते. ३. मातीची क्षारता किंवा विद्युत वाहकता : सर्वसाधारणपणे १.०० डेसी सायमन प्रति मीटरपेक्षा कमी क्षारता असलेल्या जमिनी असल्यास त्या फळबाग लागवडीसाठी योग्य, तर त्यापेक्षा जास्त क्षारता असलेल्या जमिनी लागवडीसाठी अयोग्य असतात.मातीचा नमुना घेण्याची पद्धत : जमिनीच्या प्रकारानुसार किंवा गुणधर्मानुसार सर्वप्रथम जमिनीचा रंग, चढ-उतार, खोली आदी बाबींमधील फरक लक्षात घ्यावा. त्यानुसार सारखे गुणधर्म असलेल्या शेताचे निरनिराळे विभाग पाडावेत. एकसारखे गुणधर्म असलेल्या शेताच्या एक ते दोन हेक्टर क्षेत्राचे भाग पाडावेत. त्या भागाला स्वतंत्र शेत गृहीत धरून निवडलेल्या भागातून जमिनीच्या उभ्या छेदाचा (प्रोफाइलचा) स्वतंत्र नमुना घ्यावा. शेतातील माती एकसारखे गुणधर्म असणारी असल्यास असे वेगळे भाग न करता अशा शेतामधून एकच 'प्रोफाइल' नमुना घ्यावा.

# मराठवाड्यात वाढते तापमान:शेतीसह मानवी आरोग्यासमोर नवे आव्हान

संभाजीगर

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना व बीड या तीनही जिल्ह्यांतील तापमान वाढते आहे. खासकरून रात्रीच्या तापमानातील प्रचंड चढ-उतार पिकांसह मानवांच्या आरोग्यावरही परिणाम करीत असल्याचे चित्र आहे. एकीकडे उपसा वाढला असतानाच पिकांची पाण्याची गरजही वाढते आहे.

वातावरणातील बदल तापमानातील चढ-उतार मानवांसाठी सर्दी खोकला ताप अशा आजारांना निमंत्रण देणारे ठरत आहेत. त्यामुळे आरोग्यावरील खर्चात मोठी वाढ झाली आहे. भाजीपाला आणि फळ पिकांसाठीही दिवस आणि रात्रीच्या तापमानातील चढ-उतार संकट घेऊन आले आहेत. संरक्षित शेतीतील फळभाज्यांमध्ये गळीचे प्रमाण वाढले आहे.

अपेक्षित सेटिंग होत नसल्याचा थेट परिणाम उत्पादनावर होणार हे जवळपास स्पष्ट आहे. कांद्याची लागवड साधारणतः १० जानेवारीपर्यंत होत असते यंदाची लागवड फेब्रुवारी अखेरपर्यंत सुरू राहिल्याने उशिरा लागवड झालेल्या कांद्याच्या उत्पादनाला वाढत्या तापमानाचा मोठा फटका बसणार हे स्पष्ट आहे.

दिवसाचे तापमान एकीकडे वाढत असताना रात्रीच्या तापमानातील चढ-उतार भाजीपाला वर्गीय पिकांमध्ये लाल



कोळी, करपा, थ्रिप्स, भुरी आदी संकटांना आमंत्रण देत आहेत. याशिवाय संरक्षित शेतीतील फळभाज्यांच्या पांढऱ्या मुळांची वाढही थांबल्याने पिकाला आवश्यक घटक मिळण्यात अडचण निर्माण होत असल्याची स्थिती आहे.

मोसंबी पिकात सध्या आंबिया बहराची फळे सेटिंग अवस्था सुरू आहे, वाढत्या तापमानामुळे सेट झालेली फळे वा गुंडीगळ होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात संभवितो हे टाळण्यासाठी वाफसा स्थितीत भागांना सकाळ-संध्याकाळ ओलीत करणे फायदेशीर ठरेल, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. आंब्याची ही फळे सेट झाली असताना वाढत्या तापमानामुळे गळ वाढली आहे.

**छत्रपती संभाजीनगरमध्ये ढगाळ हवामान राहण्याची शक्यता**

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानूसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पुढील पाच दिवसांत हवामान मुख्यतः कोरडे व स्वच्छ ते अंशतः ढगाळ राहील. तसेच कमाल तापमान ३६ ते ३९ अंश सेल्सिअस आणि किमान तापमान १८ ते २२ अंश सेल्सिअस दरम्यान राहील व सापेक्ष आर्द्रता २४ ते ३९ टक्के राहील तर वाऱ्याचा वेग ०१ ते ०७ किमी/तास राहण्याची शक्यता आहे.

# खिल्लार गोवंश शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायद्याचे

आपल्या महाराष्ट्रामध्ये पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या जिल्ह्यामध्ये बहुतांशी सर्वत्र तर अहमदनगर जिल्ह्याचा दक्षिण व पूर्वेकडील भाग तसेच कोकण व मराठवाड्यामध्ये काही प्रमाणात खिल्लार हा गोवंश वापरला जातो. आपल्या महाराष्ट्राच्या लगतच्या कर्नाटकातील सीमा भागात या गोवंशाची मोठ्या प्रमाणावर पैदास केली जाते. या गोवंशाच्या भौगोलिक रचनेनुसार काही पोटजाती निर्माण झाल्या आहेत. उदा. माणदेशी खिल्लार, कर्नाटकी खिल्लार, पंढरपुरी खिल्लार, नकली खिल्लार अश्या या जाती आहेत.

आपल्या भारतीय गोवंशामध्ये अत्यंत चपळ, अत्यंत काटक व अत्यंत देखणा तसाच सर्वांत जास्त किमतीचा गोवंश म्हणजे खिल्लार गोवंश होय. या गोवंशाला पांढरे सोने संबोधले जाते. खिल्लार गाय दुग्धोत्पादनासाठी कमी असली तरी शेतीकामासाठी लागणार्या खिल्लर बैलाच्या पैदासीसाठी या गोवंशाची चांगलीच ओळख आहे.

शारीरिक ठेवण : शिंगाचा रंग सफेद गुलाबी किंवा काळसर, शिंगे कोचर किंवा सरळ, कर्नाटक खिल्लारमध्ये शिंगे कपाळमाश्या जवळ एकदम लगत व चिंचकुळी सरळ तर माणदेशी खिल्लारमध्ये जाडजूड व दोन शिंगामध्ये योग्य अंतर असते, नाकपुडी लालसर गुलाबी किंवा काळ्या रंगाची असते, डोळे काळे व लांबट आकाराचे असतात, कान चेहर्याने मानाने लहान व शेपटीला टोकदार असते, मान लांब व रूंद असते, पाठीपोटात आपरेपणा नसतो. मानेखाली पोळी (लोळी) मोठी नसते, गायींमध्ये बेंबीच्या जवळील जागा अत्यंत अस्पष्ट असते. माणदेशी खिल्लार बैलांचे वशिंड मोठे व घट्ट असते, कातडी शरीरालगत घट्ट असते. केस अत्यंत लहान असतात. कातडीचा स्पर्श मुलायम असतो. शेपूट लांबलचक सापासारखे असते. मध्यम आकाराचे व आटोपशीर असतात. गायींमध्ये निरपणी ठेवण आटोपशीर व लहानसर असते, गायींमध्ये छातीकडून कासेकडे येणार्या दुधाच्या शिरा या लहान व अस्पष्ट असतात. कास आटोपशीर व लहान असते चारही सड लगत व समान उंचीचे असतात, या गोवंशाचा रंग प्रामुख्याने चमकदार पांढरा असतो, म्हैसूरी खिल्लारी आणि नकली खिल्लार यांचे मध्ये रंग काहीवेळा कोसा किंवा जांभळट कोसा छटेचा येतो. पूर्व वाढ झालेल्या गायीची लांबी १२० ते १३० सें.मी. उंची १२५ ते १३५ सें.मी. तर छातीजवळील घेर १५० ते १६० सें. मी. असते. तर बैलांची लांबी १४० ते १५० सें.मी. उंची १३५ ते १४५ सें.मी. व छातीजवळील घेर २०० ते २१० सें.मी असतो.



या गायींचे प्रथम वेताचे वय ४० ते ५० महिन्यांचे दरम्यान असते, दोन वेतांमधील अंतर १८ ते २४ महिन्यापर्यंत असते, एका वेतामध्ये सलग आठ ते दहा महिन्यापर्यंत दूध देतात. व्यायल्यानंतर दिवसाकाठी तीन ते चार लीटर दूध देतात. वासरू दिवसभर गायीबरोबर मोकळं असल्यास या गायी पाच ते सहा वेळा चांगल्या पान्हवतात व दूध पाजतात. या गायींचा माजाता कालावधी सहा ते आठ तासांचा असतो.

गावंशाचे बैल शेतीकामासाठी ताकदवान :

या गोवंशाचे बैल शेतीकामासाठी व ओढकामासाठी ताकदवान असल्याने प्रसिद्ध आहेत. तसेच शर्यतीसाठी अत्यंत प्रसिद्ध आहेत. वयाच्या तीन ते सहा वर्षांपर्यंत शर्यतीसाठी व हलक्या कामासाठी धरतात. बैल दाती जुळता की लगेच खच्चीकरण करावे म्हणजे अंगात भरतो देखील चांगला, मारकेपणा कमी होतो व मोठ्या कामांना धरता येतो.वळूसाठी आश्यक गुण : खूर काळे व सलग पाहिजेत. शिंगे कोचर किंवा सरळ, वळूपासून नर वासरांचे प्रमाण अधिक आवश्यक असते शांत व सुस्वभावी स्वभाव आवश्यक, लांब पौंडी असणे गरजेचे, कातडी पातळ व चमकदार तसेच रंग दुधासारखा पांढरा असायलाच हवा. या जातीचे बैल तापट स्वभाव व मारकेपणा बद्दल विशेष प्रसिद्ध आहेत तरी या बैलांजवळ कधीही बेसावधपणा व फाजील आत्मविश्वासाने वावरू नये कारण हे बैल माणसांचा व जनावरांचा डूख (राग) धरतात त्यामुळे कधी मारतील ह्याचा नेम नसतो. या तापटपणामुळेच काम रागारागाने झटपट करतात.




## जागतिक दिवस
## राष्ट्रीय विज्ञान दिवस

### महत्वाच्या घटना

१८४७: अमेरिकेने सकरामेंटो च्या युद्धात मेक्सिको ला हरविले.
१८४९: अमेरिकेच्या पूर्व आणि पश्चिम किनार्यांमध्ये नियमित जहाजसेवा सुरू झाली. न्यूयॉर्कहुन निघालेले एस. एस. कॅलिफोर्निया हे जहाज ४ महिने व २१ दिवसांनी सॅनफ्रान्सिस्कोला पोहोचले.
१९२२: इजिप्तला (युनायटेड किंग्डमपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९२८: डॉ. सी. व्ही. रामन यांनी भौतिकशास्त्रातील एका परिणामाचा शोध लावला. त्याला रामन इफेक्ट असे नाव देण्यात आले. यामुळे हा दिवस 'राष्ट्रीय विज्ञान दिन' म्हणुन साजरा करण्यात येतो.
१९३५: वॅलेस कॅरोथर्स या शास्त्रज्ञाने नायलॉनचा शोध लावला.
१९९५: आजच्या दिवशी अमेरिकेच्या कॉलरेडो येथील डेनवर आंतराष्ट्रीय विमानतळाची सुरुवात.
१९४०: बास्केटबॉल खेळ प्रथमच टेलेव्हिजन वर प्रक्षेपित झाला.
२०११: "द किंग्स स्पीच" या हॉलीवूड चित्रपटाला ऑस्कर पुरस्कार मिळाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७३: सर जॉन सायमन स्वातंत्र्यपूर्व काळात भारताला राजकीय सुधारणा देण्यासाठी नेमलेल्या 'सायमन कमिशन' या आयोगाचे अध्यक्ष. क्लेमंट ॲटली हे देखील या आयोगाचे एक सदस्य होते, जे पुढे इंग्लंडचे पंतप्रधान झाले. (मृत्यू: ११ जानेवारी १९५४)
१८९७: डॉ. शंकर दामोदर पेंडसे मराठी ग्रंथकार आणि संतसाहित्याचे गाढे अभ्यासक. पंढरपूर येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे (१९५५) ते अध्यक्ष होते. (मृत्यू: २३ ऑगस्ट १९७४)
१९०१: लिनस कार्ल पॉलिंग रसायनशास्त्रज्ञ आणि अण्वस्त्रांच्या विरोधात लढणारे सामाजिक कार्यकर्ते, नोबेल पारितोषिकाचे दोनदा विजेते १९५४ रसायनशास्त्र, १९६२ शांतता (मृत्यू: १९ ऑगस्ट)
१९१३: हिंदी भाषेचे प्रसिद्ध लेखक नरेंद्र शर्मा यांचा जन्म.
१९२७: कृष्णकांत भारताचे १० वे उपराष्ट्रपती (मृत्यू: २७ जुलै २००२)
१९२९: भारतीय-अमेरिकन संशोधन रंगास्वामी श्रीनिवासन यांचा जन्म.
१९४२: ब्रायन जोन्स 'द रोलिंग स्टोन्स'चे संस्थापक, गिटार, हार्मोनिका आणि पियानो वादक (मृत्यू: ३ जुलै १९६९)
१९४४: रविन्द्र जैन संगीतकार व गीतकार
१९४७: मध्य प्रदेश चे माजी मुख्यमंत्री विजय बहुगुणा यांचा जन्म.
१९४७: मध्य प्रदेश चे माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह यांचा जन्म.
१९४८: विदुषी पद्मा तळवलकर ग्वाल्हेर/किराणा/जयपूर घराण्याच्या ख्याल गायिका
१९५१: करसन घावरी भारतीय क्रिकेटपटू
१९६८: मराठी चित्रपट अभिनेत्री वर्षा उसगावकर यांचा जन्म.
१९६८: प्रसिद्ध हिंदी लेखक हुसैन जैदी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५७२: महाराणा प्रताप यांचे वडील राणा उदयसिंह यांचे निधन.
१९२६: स्वातंत्र्यशाहीर गोविंद त्र्यंबक दरेकर उर्फ कवी गोविंद यांचे निधन लहानपणीच तापामुळे कमरेखालील सर्व अंग लुळे पडून त्यांना कायमचे अपंगत्व आले, त्यामुळे त्यांचे शिक्षणही होऊ शकले नाही. कविता मात्र बालपणापासून करीत होते. स्वातंत्रवीर सावरकरांशी निकटचे संबंध आल्यानंतर त्यांच्या कवितेला उत्कट राष्ट्रभक्तीची आणि तीव्र स्वातंत्र्याकांक्षेची दिशा गवसली. (जन्म: ९ फेब्रुवारी १८७४ नाशिक)
१९३६: कमला नेहरू पं. जवाहरलाल नेहरू यांच्या पत्नी पुण्यतिथि (जन्म: १ ऑगस्ट १८९९)
१९६३: डॉ. राजेन्द्र प्रसाद भारताचे पहिले राष्ट्रपती (जन्म: ३ डिसेंबर १८८४)
१९६६: उदयशंकर भट्ट आधुनिक हिंदी नाटककार, एकांकिकाकार, कवी आणि कादंबरीकार. त्यांनी पंजाब विद्यापीठातून'शास्त्री' आणि कलकत्ता विद्यापीठातून 'काव्यतीर्थ' या उपाध्या मिळवल्या.
१९६७: टाईम मॅगझिन चे सहसंस्थापक हेन्री लूस यांचे निधन. (जन्म: ३ एप्रिल १८९८)
१९८०: भारताचे राजनीति तज्ञ पंडित के. संतानम यांचे निधन.
१९८६: स्वीडनचे २६ वे पंतप्रधान ओलोफ पाल्मे यांची हत्या. (जन्म: ३० जानेवारी १९२७)
१९९५: कृष्ण गंगाधर दिक्षीत ऊर्फ कवी संजीव 'सासरमाहेर', 'भाऊबीज', 'चाळ माझ्या पायांत' या चित्रपटांचे त्यांनी कथा, संवाद व गीतलेखन केले होते.
१९९८: राजा गोसावी अभिनेता यांचे निधन
१९९९: भगवंतराव श्रीपतराव पंतप्रतिनिधी औध संस्थानचे राजे )

# कोकणात उष्ण आणि दमट हवामानाचा अंदाज कायम

पुणे : राज्यातील तापमानात काहीसे चढ उतार कायम आहेत. किमान तापमानात वाढ झाली मात्र कमाल तापमान स्थिर दिसत आहे. हवामान विभागाने आजही कोकणत उष्ण आणि दमट हवामानाचा इशारा म्हणजे येलो अलर्ट दिला. तर राज्यातील उन्हाचा कडाका कायम राहील, असाही अंदाज हवामान विभागाने दिला.

राज्यातील किनारपट्टीच्या भागात तापमानात सरासरी ४ ते ५ अंशाची वाढ झाली आहे. मुंबईतील सांताक्रुझ येथे सर्वाधिक ३८.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. तर डहाणू येथे ३८.२ अंश सेल्सिअस तापमान होते. रत्नागिरीतही ३७.२ अंश सेल्सिअस तापमान होते. राज्यातील किमान तापमानात मात्र चांगलीच वाढ झाली. निफाड येथील गहू संशोधन केंद्रात सर्वात कमी १२.९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. हवामान आजही कोकणातील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्ह्याला आज उष्ण आणि दमट हवामान इशारा म्हणजेच येलो अलर्ट हवामान विभागाने दिला. तर ठाणे जिल्ह्यासाठी उद्याही अलर्ट दिला आहे. रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यात ३ मार्चलाही उष्ण आणि दमट हवामानाचा येलो अलर्ट देण्यात आला.

cmyk

# सप्ताह म्हणजे राष्ट्रीय एकात्मता दर्शविणारी परंपरा-जयदत्त क्षीरसागर



बीड । प्रतिनिधी

गेल्या २९ वर्षांपूर्वी सुरू केलेला भगवान बाबा प्रतिष्ठान येथील अखंड हरिनाम सप्ताह आज राष्ट्रीय एकात्मतेची परंपरा जपत आहे. विविध सामाजिक उपक्रम राबवून या ठिकाणी सर्व जाती धर्मातील लोकांना एकत्रित करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले आहे.

श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान येथे २९ वा अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी महंत त्रिविक्रमानंद महाराज यांच्या कीर्तन प्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची उपस्थित होती. समितीच्या वतीने प्रारंभी स्वागत करण्यात आले तसेच प्रतिष्ठानच्या विकासासाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या प्रयत्नातून निधी मंजूर झाल्याबद्दल संयोजकाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, स्व.डॉ.श्रीहरी लहाने यांनी या प्रतिष्ठानसाठी मोठे योगदान दिले आहे. या प्रतिष्ठानच्या विकासासाठी सातत्याने संपर्कात होते सत्ता असो अथवा नसो सेवाभाव ठेवून आपण काम करतो त्यामुळे प्रतिष्ठान साठी मला हातभार लावता आला याची समाधान वाटते श्रद्धेची सुमने वाहण्याची संधी मिळते या ठिकाणी अनेक उपक्रम राबवले जातात वै. बंकट स्वामी महाराजांनी सुरू केलेली किर्तन परंपरा आज ग्रामीण भागापर्यंत पोहोचले आहे. माणुसकीची शिकवण या माध्यमातून दिली जाते. संत कुठल्या जातीत जन्मले आणि कोणत्या समाजासाठी काम केले यापेक्षा त्यांनी समाजासाठी योगदान दिले हेच महत्त्वाचे असते माणूस कुठल्या जातीत जन्माला यावा हे विधात्याच्या हाती असते, माणसाचा जन्म समाजासाठी कारणी लागतो हेच यातून बोध घेण्यासारखे आहे. मलाही धार्मिक स्थळाच्या विकासासाठी सेवा करण्याची संधी मिळाली आहे. धार्मिक स्थळांचा विकास होणे गरजेचे आहे कारण याठिकाणी हजारो भाविकांची उपस्थिती असते त्यांना सुविधा मिळाल्या पाहिजेत असे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी सांगितले. यावेळी विलास बडगे, दिनकर कदम, अरुण डाके, ह.भ.प. हरिदास जोगदंड, सखाराम मस्के, नवनाथ कुलकर्णी, ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे, स्वामी शिवरुद्रनंद महाराज, ह.भ.प.बाबुराव मुंडे, रामनाथ खेडकर, अनिरुद्ध सानप, ॲड.जयंत राख, नाना सानप, नारायण मुंडे, बाजीराव खेडकर, डॉ.सुधाकर आंधळे, गरकळ बाबा, डॉ.माधव सानप, गणेश खाडे, उमेश फड, महादेव घोळवे, प्राचार्य वसंतराव सानप, प्रा.गर्जे,पत्रकार नारायण नागरे, आनंद घुगे, ज्ञानोबा वायबसे यांच्यासह परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळणे ही आपली खरी श्रीमंती-डॉ. मधुकर आघाव



परळी । प्रतिनिधी

नवगण शिक्षण संस्थेच्या कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांमध्ये आज दिनांक २७ फेब्रुवारी मराठी राजभाषा दिनाच्या निमित्ताने प्राचार्य डॉ मधुकर आघाव हे बोलत होते यावेळी व्यासपीठावर प्रसिद्ध कवी अनंत मुंडे, कवी इंगळे सर, डोईफोडे, डॉ बापू घोलप, मोहन गीते, डॉ राजाभाऊ धायगुडे इत्यादींची उपस्थिती होती

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ आघाव म्हणाले की मराठी भाषा एवढी समृद्ध आणि पुरातन आहे की तिला शासनाने अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. .

मराठी भाषाला हा बहुमान मिळणे ही आपली खरी श्रीमंती आहे. यावेळी शाहीर अनंत मुंडे यांनी मराठी भाषा गौरवपर काव्य गायन केले तसेच इंगळे सर यांनीही मराठी भाषेचे अभिमान गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक विभाग प्रमुख डॉ राजाभाऊ धायगुडे यांनी केले तर आभार डॉ बापू घोलप यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी आणि प्राथमिक व माध्यमिक शाळेतील प्रशिक्षणार्थी शिक्षकांची उपस्थिती होती.

## थोडक्यात

### वाघे यांचा सेवापूर्वी सोहळा

बीड। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मराठी विषयाचे प्राध्यापक पी.एच.वाघे सर हे शुक्रवार २८ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त होत असुन या निमित्ताने मांजरसुंबा येथील कन्हैया हॉटेलच्या हॉलमध्ये सकाळी ११ वाजता सेवापूर्ती सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.प्राध्यापक पी.एच.वाघे सर यांच्या सेवापूर्ती सन्मान सोहळ्याच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भालचंद्र शिक्षण संस्थेचे सचिव दिपक घुमरे हे उपस्थीत राहणार असुन प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष यु.बी.सुकाळे, उपाध्यक्ष कल्याण वाणी, भालचंद्र उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य के.बी. सावंत, काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष प्रा.सर्जेराव काळे, माजी प्राचार्य यु.एस.बांगर, दगडू चव्हाण, माजी प्राचार्य पुजदेकर, माजी प्राचार्य एल.ए.जाधव, युसुफवडगाव हायस्कुलचे प्राचार्य भोसले, संस्थेचे सर्व संचालक उपस्थीत राहणार आहेत. कार्यक्रमास उपस्थीत राहण्याचे आवाहन भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

### महाशिवरात्रीनिमित्त आनंद अनुभूती शिबीर

बीड। प्रतिनिधी

बीड शहराचे वरिष्ठ तसेच बंगलोर प्रशिक्षक विश्वनाथ गडकर व नवनिर्वाचित टीचर शर्मिला काळे यांच्या सानिध्यात शहरात बीडमध्ये आर्ट ऑफ लिव्हींग आनंद अनुभूती शिबीर हॅप्पीनेस सेंटर, गडकर निवास,अंबिका नगर,पालवण रोड,बीड येथे संपन्न झाले.या शिबिरात योग, ध्यान, प्राणायाम, तसेच जगातील अद्भूत सुदर्शन क्रिया करुन तणावरहित जीवन कसे जगायचे तसेच शांत झोप लागणे, सकारात्मक विचार,आत्मविश्वास,मान दुखी, पाठ दुखी, तसेच पित्तअसे आजारापासून मुक्त झाले असलेल्यांना चांगले अनुभव आल्याचे सांगण्यात आले. दैनंदिन कामकाज न थकता आनंदाने करण्याची कला या शिबिरातून शिकलो असे अनुभव आलेल्या शिबिरातील लोकांनी म्हटले आहे. सदरील शिबिर यशस्वी करण्यासाठी भाग्यश्री लोखंडे,सारिका उगले आदींनी परिश्रम घेतले.

### १ मार्च रोजी राज्यस्तरीय शैक्षणिक अधिवेशन

बीड। प्रतिनिधी

राज्यभरातील खाजगी शिक्षण संस्थांच्या प्रश्नावर शासन दरबारी आवाज उठविण्यासाठी खासदार सुप्रिया सुळे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार दिनांक १ मार्च रोजी पार पाडणाऱ्या या आदेशनास प्रमुख पाहुणे म्हणून माननीय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. राज्यातील विविध शिक्षण संस्था व संघटनांच्या वतीने आयोजित केलेले हे अधिवेशन इंडियन एज्युकेशन सोसायटी , राजा शिवाजी विद्या संकुल , दादर मुंबई येथे सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत भरणार आहे. अशी माहिती शिक्षक नेते श्री उत्तम पवार यांनी प्रसिद्धी पत्रकारद्वारे दिली आहे. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील , शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे , उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत , माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणाऱ्या या अधिवेशनास माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी व कायदे तज्ञ स्वाती दीक्षित हे मार्गदर्शन करणार आहेत . शिक्षण क्षेत्राची सद्यस्थिती व भविष्यकाळ पाहता अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागणार आहे . या पुढील काळात राज्यभरातील सर्व खाजगी शिक्षण संस्थांना भेडसावणाऱ्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन श्री पवार सर यांनी केले आहे.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/८२
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १८/०२/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) कैलास लक्ष्मण मैड सर्व्हे नं.४ सहन प्लॉट नं. १२ न.प.मि.न.१८-६९-३२/२ चे वारसा अधारे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (३२) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- अशोक मोटकर यांचा प्लॉट नं. ३२ मधील भाग
पश्चिम :गोवर्धन लक्ष्मण मैड यांच प्लॉट
दक्षिण- कॉलनी अंतर्गत ९ मिटर रुंदीचा रस्ता
उत्तर : प्लॉट नं. २७ मधील भाग

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान महाशिवरात्र महोत्सवाची काल्याच्या किर्तनाने सांगता



लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्री क्षेत्र बेलेश्वर संस्थान मार्फत महाशिवरात्र महोत्सव प्रित्यर्थ दरवर्षी प्रमाणे दि.२० गुरुवार रोजी पासून पासून गुरूवर्य महंत मठाधिपती महादेव भारती महाराज आणि मठाधिपती शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण , महाशिवरात्री महोत्सव सोहळ्याची सांगता आज दि.२७ गुरुवार रोजी अध्यक्ष बंकटस्वामी संस्थान नेकनुर ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या सुश्राव्य अमृततुल्य दहिहंडीच्या कार्यक्रमाने अर्थात काल्याच्या किर्तनाने झाली.भगवान श्रीकृष्णांनी अवतार घेतल्यापासून बालपणी केलेल्या विविध लीलांचे वर्णन त्याचप्रमाणे अवतार संपेपर्यंत जीवनप्रवासावर प्रबोधन केले. विश्वाचे मुळ भगवान परमात्मा असुन हे विश्वची माझे घर या न्यायाने माणसाने वागायला हवे.भगवंताचे नामस्मरण करायला हवं.परमात्मा सर्व जगाचा मालक असुन उपाधी विरहित भगवान परमात्म्याच्या माध्यमातून विश्वाची निर्मिती झाली असा गोड संदेश त्यांच्या वाणीतुन भाविक भक्तांना संदेश देत मंत्रमुग्ध केले. यावेळी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अखंड हरिनाम सप्ताह कालावधीत वेगवेगळ्या विषयांवर खालिल नामांकित किर्तनकारांकडुन बबन महाराज मंझरीकर(हवेली), अक्षय महाराज पिंगळे बीड,रामायणाचार्य एकनाथ महाराज गाडे चकलांबा, वारकरी भुषण राम महाराज डोंगर आळंदी, रामहरी महाराज वायबसे सावरगाव,प्रेममुर्ती धर्मराज (दादा) महाराज सामनगाव,विनोदाचार्य दिपक महाराज बादाडे माजलगाव यांची किर्तनाद्वारे समाज प्रबोधन करत सेवा संपन्न झाली.पंचक्रोशितील विविध गावांतील मृदुंगाचार्य, वारकरी,भजनी मंडळ यांच्या द्वारे हरिजागर आणि प्रवचने भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन बेलेश्वर संस्थान महाशिवरात्र उत्सव कमिटी बेलगाव, बेलगाव तरूण मंडळ, विश्वस्त मंडळ यांच्या वतीने करण्यात आले होते. किर्तनानंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. बेलेश्वर संस्थान महाशिवरात्र महोत्सव सांगता सोहळ्यात राजकीय नेत्यांची लक्षणीय उपस्थिती होती.यावेळी खा.बजरंग बप्पा सोनावणे, शिवसंग्राम राष्ट्रीय अध्यक्ष ज्योतीताई मेटे, जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस राजेंद्र मस्के, शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष सुभाष जाधव,सभापती बळीआप्पा गवते,मराठा सेवक हनुमान मुळीक, पंचायत समिती सदस्य पिंटु ठोंबरे, बबन माने यांची उपस्थिती होती. संस्थानच्या वतीने महंत शांतीब्रम्ह तुकाराम महाराज यांनी शाल श्रीफळ व पुष्पहार घालून सत्कार केला. खा.बजरंग सोनावणे, ज्योतीताई मेटे, राजेंद्र मस्के यांनी संस्थानप्रती कृतज्ञता व्यक्त करत संस्थानच्या विकासासाठी भरीव योगदान देण्याचे आश्वासन दिले.

# हायवा जमा करण्यासाठी तहसीलची पोलीस स्टेशनला नोटीस

जालना । प्रतिनिधी

अंबड पोलीस स्टेशन मध्ये एक छोटा टिप्पर वर गुन्हा दाखल करण्यात आला होता त्याप्रकरणी अंबड पोलिसांनी तपास करण्यासाठी हवा तहसील कार्यालया मधून नेला होता परंतु हायवा परत न केल्यामुळे तहसील कार्यालयामार्फत अंबड पोलीस स्टेशनला नोटीस देण्यात आली. याप्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये विचारणा करण्यासाठी आमचे प्रतिनिधी गेले असता त्यांना उलट सुलट आर्वी भाषा सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी धमकी देण्यासारखा भाषाचा वापर केला याप्रकरणी पोलीस अधीक्षक यांनी कारवाई करावी.

याप्रकरणी सविस्तर घटनेची माहिती ताबा पावती दि.०६/०२/२०२५ रोजीची आहे, दि. ०६/०२/२०२५ रोजी चेसी क्र. ३०८६२ असा असलेला मिनी हायवा हा गुन्ह्याच्या तपास कामी आपल्या ताब्यात देण्यात आला होता. सदर हायवा वरील महसूल विभागाची दंडात्मक कार्यवाही करणे बाकी आहे. सदरील मिनी हायवा तात्काळ या कार्यालयास जमा करण्यात यावा. असे नोटीस तहसिलदार तथाकार्यकारी दंडाधिकारी यांच्यामार्फत सदरील नोटीस अंबड पोलीस स्टेशनला देण्यात आले आहे. सदरील नोटीची प्रत उपविभाग अधिकारी व जिल्हाधिकारी यांना माहितीस्तव देण्यात आली. याविषयी सविस्तर माहिती अशी की पोलीस ठाणे अंबड गुरनं-६०/२०२५ कलम-३०३(२), था. न्या. संहीता गुन्हयातील जत हायया ताब्यात मिळणे बाबत. पोलीस ठाणे अंबड यांचे पत्र जा.क .३४९/२०२५ दि.०५.०२.२०२५,फिर्यादी प्रमोद उत्तम काटकर वय-४४ वर्ष व्यवसाय नोकरी मंडळ अधिकारी जामखेड रा. संभाजी नगर अंबड ता. अंबड जि. जालना यांनी दिनांक ०४/०२/२०२५ रोजी पोलीस ठाणे अंबड येथे दिले फिर्याद वरुन पोस्टे गुरन-६०/२०२५ कलम-३०३(२), भा.न्या. संहीता प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयातील जप्त हायवा ज्याचा चेसीस क्र. क्र. ३०८६२ असा असलेला मिनी हायवा हा गुन्हयाचे तपास कामों जप्त करणे असल्याने गुन्हयाचे तपासकामी ताब्यात मिळणेस विनती केली होती. त्या वरून जप्त हायवा ज्याचा चेसीस क्र. क्र. ३०८६२ असा असलेला मिनी हायवा हा गुन्हयाचे तपास कामी आपल्या ताब्यात देण्यात येत आहे परंतु सदर वाहनावर महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४८(७) (८) अन्वये दंडाची कार्यवाही पूर्ण झाल्याशिवाय वाहन सोडण्यात येऊ नये असाही उल्लेख नोटीस मध्ये आहे.



**मंठा : तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शंकरनगर येथील मुलांनी शैक्षणिक सहल नुकतीच संपन्न झाली. सहलीत ऐतिहासिक, वैज्ञानिक, भौगोलिक स्थळांना भेटी देऊन स्थळांची विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. बिबी का मकबरा, पाणचक्की, सिद्धार्थ गार्डन मधील प्राणिसंग्रहाल त्याचबरोबर मंठा येथील दगडाच्या खाणीला भेट देऊन जमिनीतून मोठे दगड (कातळ) कसे निघतात याची माहिती घेतली. सोबत प्राथमिक शिक्षक अतिक पठाण होते.**

# ज्ञानार्जनाची भूक असणे गरजेचे -हांगे



पाटोदा। प्रतिनिधी

ज्याला ज्ञान घेण्याची खरी भूक असते अशाच विद्यार्थ्याला शिक्षक ज्ञान देऊन अधिक सामर्थ्यशाली बनवू शकतात. आजच्या स्पर्धेच्या युगात जो ज्ञान व नवनवीन कौशल्ये हस्तगत करेल तोच उद्याच्या जगात टिकेल. ज्यांनी ज्ञान प्राप्त केले ते जीवनात नेहमी यशस्वी सिद्ध झाले, म्हणून विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाची भूक असणे गरजेचे आहे असे प्रतिपादन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २७ फेब्रुवारी रोजी आयोजित माजी विद्यार्थी व पालक मेळाव्यात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

मेळाव्यास प्रमुख अतिथी म्हणून माजी विद्यार्थी तथा पाटोद्याच्या सेवा सहकारी संस्थेचे संचालक सय्यद साजेद इकबाल, ॲड. सुशील कवठेकर, शिवाजीराव घरत उपस्थित होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. गणेश पाचकोरे उपस्थित होते. कार्यक्रमात पालक प्रतिनिधी म्हणून मारुती गिरी यांचा सत्कार करण्यात आला. तसेच उपस्थित पालकांचे व माजी विद्यार्थ्यांचे शिक्षकांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सय्यद साजेद म्हणाले की पालकांनी आपल्या पाल्यांच्या आवडीचे क्षेत्र निवडून प्रोत्साहन द्यावे तसेच आजच्या सामाजिक परिस्थितीत प्रत्येक नागरिकाने इतर समाजांचा आदर करावा ज्यामुळे सामाजिक सलोखा निर्माण होईल.

ॲड. सुशील कवठेकर आपल्या मनोगतात म्हणाले की महाविद्यालय विद्यार्थ्यांना केवळ ज्ञानदान करत नाही तर त्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्व घडविते. शिक्षकांनी व पालकांनी विद्यार्थ्यांचे अंगभूत गुण ओळखले पाहिजेत व त्यानुसार त्यांना मार्गदर्शन केले पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी विद्यार्थी व पालक समन्वय समितीचे अध्यक्ष प्रा. जगन्नाथ पटाईत यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. कुशाबा साळुंके यांनी केले. आभार डॉ. हनुमान खेत्री यांनी मानले. मेळाव्यास माजी विद्यार्थी व पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

# अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्र दुर्लक्षितच -प्रा. सुशीला मोराळे

बीड। प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्रात आमुलाग्र बदल घडून आणण्यासाठी स्वतंत्र्योत्तर का आणि स्वतंत्र पूर्व काळात अनेक आयोग नेमले गेले. स्वातंत्र्य पूर्वकाळात मेकोलो या शिक्षण तज्ञांनी भारतीयांना शिक्षित करण्यासाठी फिल्टर डाउन थेअरीची सूचना केली. १८८२ मध्ये हंटर आयोगाने तळागाळातील भारतीयांना शिक्षण मिळावे म्हणून ज्योतिराव फुले यांनी केलेल्या सूचनांची शिफारस तत्कालीन सरकारला केली अनेकांनी हंटरसमोर आपले मत मांडले परंतु प्रमुख दोन व्यक्तींनी त्यापैकी एक लोकमान्य टिळक म्हणाले होते. आय एस ची परीक्षा भारतात घ्या. दुसरे महात्मा ज्योतिराव फुले म्हणाले होते प्राथमिक मातृभाषेतले शिक्षण मोफत व सक्तीचे द्या. फुले यांनी मेकोलोच्या फिल्टर डाउन थेअरी झिरपणारे शिक्षण विरोध केला.

मॅकॉलेचे म्हणने होते देशातले श्रीमंत उच्चवर्णीय पहिल्यांदा शिकतील व त्यानंतर ते खालच्यांना म्हणजे वंचित उपेक्षित शोषित पिछड्यांना शूद्र अति शूद्र स्त्रियांना शिकवतील. त्या काळातील चातुर वर्ण व्यवस्थेमुळे हे शक्य नाही असा युक्तिवाद फुलेंनी केला आणि मेकोलाच्या शिक्षण पद्धतींना विरोध केला होता. स्वातंत्र्योत्तर काळातही कोठारी आयोग मुदलियार आयोग चिपळूणकर आयोग नाही काय असे अनेक आयोग नेमले गेले होते यापैकी कोठारी आयोगाने राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहा टक्के खर्च करावा असे सुचवले मात्र प्रत्यक्षात हे होऊ शकले नाही. राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहा टक्के निकषाप्रमाणे शिक्षणावरील तरतूद १९.५८ लाख कोटी रुपये अपेक्षित आहे मात्र २०२४ ला प्रतीक्षा केवळ १.२५ लाख तरतूद केली गेली. शिक्षणासारख्या मनुष्यबळ विकासावर सरकार खर्च करायला तयार नाही. शिक्षण क्षेत्राकडे दुर्लक्ष म्हणजे आमच्या अनेक पिढ्या घरात करण्यासारखे आहे. भौतिक साधनापेक्षाही शिक्षण महत्त्वाचे आहे असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे म्हणणे आहे. सन्मान मिळवायचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे त्यांचे मत आहे. निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मधून शिक्षण आणि सन्मान दोन्ही नाकारले आहे. शिक्षण व संशोधन यावरील राष्ट्रीय उत्पन्नाच्या २.९% असलेले तरतूद वाढवणे गरजेचे होते परंतु जीडीपीच्या केवळ ०.२% एवढ्या खर्चाचीच तरतूद करण्यात आली आहे. सरकारला शिक्षणामुळे कौशल्य निर्मिती होते याचा विसर पडलेला आहे राज्यकर्ते शिक्षणाशिवाय शाळा आणि शिक्षणाशिवाय विद्यार्थी ही मोहीम राबवत आहेत. उलट शिक्षण क्षेत्र खाजगी उद्योगपतींना बहाल केले जात आहे. कोठारी आयोगाने शिक्षणावरचा खर्च सहा टक्के करावा असे म्हटले होते परंतु राज्यकर्त्यांचा शिक्षणाकडे बघण्याचा विषमतावादी दृष्टिकोन दिसून येत आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स अँड पॉलिसी या अर्थ मंत्रालयाची थिंकटॅक समजल्या जाणाऱ्या संस्थेनेच या तोकड्या तरतुदी बदल सरकारचे कान टोचले आहेत मागील तीन वर्षात प्रगती झपाट्याने झाली असली तरी शिक्षण व आरोग्याच्या खर्च हा जेमतेमच आहे. १९९० ते २०२० या तीस वर्षातील सामाजिक खर्चाच्या अध्ययनातून हा हिशोब मांडला गेला आहे. जीडीपीच्या निकषाप्रमाणे १९.५८ लाख कोटी खर्च अपेक्षित होता मात्र प्रत्यक्षात १.२५ लाख कोटीच खर्चाची करण्यात आली आहे. अर्थ मंत्रालयाने तज्ञांची बैठक बोलावली होती त्यांनीही शिक्षण व आरोग्यावरचा खर्च अपुरा असल्याचे सांगितले होते १९९० ते २०२० या तीस वर्षात जीडीपीच्या उत्पन्नात वाढ झाली असली तरी तुलनेने सामाजिक सेवा वरील खर्च तटपुंजा आहे. १९९० ला हा खर्च जीडीपीच्या ५.८% होता २०२० मध्ये ६.८% असला तरी जगाच्या तुलनेत आपण खूपच मागे आहोत असे दिसून येत आहे. एक मार्च २०२५ रोजी मुंबई येथे महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महासंघाचे राज्य अधिवेशन होणार आहे शिक्षण विषयावर या अधिवेशनात चर्चा होणार आहे या पार्श्वभूमीवर राज्य सरकार काय बदल करणार हे पाहणे महत्त्वाचे आहे. जागतिक स्तरावरील शास्त्रज्ञ म्हणतात ज्या देशात शिक्षणाचा खर्च अपुरा केला जातो त्या देशात गुन्हेगारी नियंत्रणावरचा खर्च वाढतो राज्य सरकारने याची नोंद घेणे गरजेचे आहे.

# सांघिक खेळातून आत्मविश्वास, बंधुभाव व समाजभान वृद्धिंगत होण्यास मदत -डॉ.इंगोले

## कृषि महाविद्यालय अंबाजोगाई येथे क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन; कृषिचे विद्यार्थी सर्व क्षेत्रात अग्रेसर – विजय पवार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**कृषि महाविद्यालय, अंबाजोगाई येथे, जिमखाना विभागाच्या वतीने व कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.संजीव बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे आय.एम.ए सांस्कृतिक अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले व तालुका कृषी अधिकारी विजय पवार यांच्या हस्ते करण्यात आले.**

यावेळी व्यासपीठावर महोत्सवाचे उद्घाटक म्हणून तालुका कृषि अधिकारी विजय पवार, तर कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक अतिथी म्हणून सांस्कृतीक समिती, महाराष्ट्र आय.एम.ए.चे सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले



तसेच प्राचार्य संजीव बंटेवाड हे उपस्थित होते.

याप्रसंगी खेळाडू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विजय पवार म्हणाले की, खेळातून माणसाची खिळाडू वृत्ती जाग्रत होत असते. त्यामुळे माणसाला आनंदी राहण्यास मदत होते. कृषीचे विद्यार्थी हे सर्वार्थाने सर्वगुणसंपन्न असतात. त्यामुळे सांस्कृतिक, सामाजिक व प्रशासकीय तसेच अन्य क्षेत्रात त्यांची कामगिरी उल्लेखनीय असते. प्रमुख अतिथी म्हणून बोलताना सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ.राजेश इंगोले आपल्या मार्गदर्शनपर मनोगतात, सांघिक खेळातून बंधुभाव व समाजभान वृद्धिंगत होण्यास मदत होते. खेळातून माणसाचा केवळ शारिरीकच नाही तर मानसिक व भावनिक विकास सुद्धा होत असतो. विद्यार्थ्यांनी प्रखर ध्येयवाद समोर ठेवून, दुर्दम्य इच्छाशक्ती आणि कठोर परिश्रमाच्या बळावर यश संपादन करावे. खेळाचे मानवी जीवनामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. खेळातूनच माणूस संघर्ष करायला शिकत असतो.

मैदानी खेळ खेळाडूंचा आत्मविश्वास, मनोबल आणि पान ३ वर

# समाजाला संत विचारांचीच खरी गरज –ह.भ.प. रामचंद्र महाराज जगताप

**माजलगाव । प्रतिनिधी**

**समाजाला मानवी जीवनाची तत्त्वे, संतांचे विचार व ज्ञानाची देवाणघेवाण यांची गरज आहे. आजच्या समाजाला व विद्यार्थ्यांना खरी गरज संतांच्या विचारांची आहे. त्यांचे विचार आजच्या विद्यार्थ्यांना अतिशय प्रेरणादायी आहेत,असे प्रतिपादन ह.भ.प. रामचंद्र महाराज जगताप यांनी केले.**



माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी येथील लाल हनुमान मंदीरात दि.२६ फेब्रुवारी बुधवार पासून सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या पहिल्या दिवशीच्या किर्तनरूपी सेवेत ते बोलत होते,संतांच्या विचारांचा मानवी जीवनाच्या कल्याणासाठी प्रभावी वापर होऊ शकतो.त्यातूनच आजची पिढी आपले जीवन समृद्ध करू शकते, हे प्रत्येक विद्यार्थ्याने जाणले पाहिजे.यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. संताचे खरे विचार विद्यार्थ्यांनी घेऊन सामाजिक कार्य करावे,असेही जगताप महाराज यांनी यावेळी सांगितले.

यावेळी भागवताचार्य बाळु महाराज उगले, गायनाचार्य नाथ महाराज जाधव,मधुकर सर्जे,राधेश्याम खेत्री,मलकार्जुन खेत्री,महादेव जंगले, जगन्नाथ यादव यांनी भजन व भक्तिगीते गायली.त्यांना मृदंगचार्य मनोहर महाराज थोरे यांनी साथ दिली.यावेळी श्रोत्यांची मोठी उपस्थिती होत

# डोईठाण येथे डीजेमुक्त शिवजयंती साजरी

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील डोईठाण येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवजयंती उत्सव समिती यांच्यावतीने डीजेला फाटा देत लेझीम व पारंपारिक वाद्य वाजवून शिवजयंती साजरी करण्यात आली.

यामध्ये सकाळी महाराजांच्या अर्धाकृती आता कधी पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी यावेळी पद्मावती विद्यालय डोईठाण येथील शालेय विद्यार्थ्यांनी चित्त थरारक कसरती व हलगीच्या तालावर लेझीम कला सादर केली.शिवरायांच्या जीवनावर आधारित पोवाडे तसेच भाषण पार पडली यानंतर संध्याकाळी आठच्या वेळेस छत्रपती शंभुराजे यांच्या जीवनावर गाजत असलेला सध्याचा छव हा सिनेमा पूर्णपणे गावातील व पंचक्रोशीतील सर्व लहान थोर महिला भगिनी व शिवभक्तांना मोफत दाखवण्यात आला अशा पद्धतीने शिवजयंती ही डीजे मुक्त साजरी करण्यात आली.

# डॉ. विठ्ठल जाधव यांच्या 'रानरांगूळ' कथासंग्रहाचे प्रकाशन

## मराठवाडी ग्रामबोलीचा परिपोष 'रानरांगूळ' ने जपला

शिरूर कासार । प्रतिनिधी

शेतीमाती, रोजगार आणि वर्तमान जीवनाचे दाहक प्रश्न मांडणारे डॉ. विठ्ठल जाधव यांच्या 'रानरांगूळ' या कथासंग्रहाचे प्रकाशन विधान परिषद सभापती आ. नीलम गोऱ्हे, बालभारतीचे किरण केंद्रे, साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त एकनाथ आव्हाड, संगीता बर्वे, भाऊ तोरसेकर, घनश्याम पाटील, संदीप वाघचौरे यांचे हस्ते ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात



दिल्ली येथे ऐतिहासिक तालकटोरा स्टेडियमवर झाले.

वर्तमानकाळात ऊस, कापूस, शेतमालाचे आणि शेतीचे प्रश्न निर्माण झाले आहेत. वाढती महागाई, शिक्षण, आरोग्य, रोजगार या विवंचनेत समाज आहे. यासंबंधी कथांच्या माध्यमातून शोषितांचे होणारे शोषण आणि धनाढ्याचे होत असलेले पोषण यासाठी 'रानरांगूळ' कथासंग्रह महत्त्वपूर्ण ठरतो. शिरूरचे साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांच्या मराठवाडी ग्रामबोलीचा परिपोष जपलेल्या 'रानरांगूळ' या कथासंग्रहाचे प्रकाशन दिल्ली येथे दि. २१ ते २३ दरम्यान झालेल्या ८९ व्या अ.भा.म.सा. संमेलनात यशवंतराव चव्हाण सभामंडपात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व्यासपीठावर संपन्न झाले. विधान परिषद सभापती आ. नीलम गोऱ्हे, पान ३ वर

# मालमत्ताधारकांनी थकीत व चालू बाकी तत्काळ भरणा करावी

अंबड । प्रतिनिधी

अंबड शहरातील मालमत्ताधारक, नळ कनेक्शन धारक व नगर परिषद दुकान गाळेधारक यांचेकडे नगर परिषदेची कराची मोठ्या प्रमाणात थकबाकी असून सध्या नगर परिषदेमार्फत विशेष वसुली मोहीम सुरु आहे. ज्या थकबाकीदारांकडे कराची रक्कम थकीत आहे. तसेच चालू बाकी. त्यांनी नगर परिषदेच्या वसुली पथकाकडे अथवा नगर परिषदेतील कर विभागात कराची रक्कम तात्काळ भरणा करावी. तसेच कर वसुली बाबत मध्येस्ती करू नये किंवा राजकीय वापर करू नये अशी विनंती करण्यात येत आहे.कर न भरल्यास थकबाकीदारांच्या मालमत्ता सील लावण्यांत येईल. तसेच थकीत पाणीपटटी असणा-यांचे नळ कनेक्शन बंद करण्यांत येतील,

तरी नगर परिषदेचा कर भरणा करुन नगर परिषदेस सहकार्य करावे, असे नगर परिषदेच्या वतीने करण्यात येत आहे.

# मंगेश मुळी यांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर; पुणे येथे आज होणार वितरण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेमध्ये कार्यरत असलेले उपक्रमशील शिक्षक मंगेश नारायणराव मुळी यांना दैनिक शिवजागर, विश्वनाथ फौंडेशन व इन्फ्रोडॅड यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. आज पुणे येथे आयोजित महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार-२०२५ या दिमाखदार सोहळ्यात हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मंगेश मुळी यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.



मंगेश मुळी हे मराठवाड्याच्या शैक्षणिक क्षेत्रात सातत्यपूर्ण उत्कृष्ट कार्य करणाऱ्या भारतीय शिक्षण प्रसारक संस्था या नामांकित संस्थेमध्ये संस्कृत विषयाचे विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी अंबाजोगाई, उदगीर येथे सेवा कार्य केले आहे. सध्या ते माजलगाव या ठिकाणी संस्कृत शिक्षक म्हणून अध्यापनाचे कार्य करीत आहेत. विद्यार्थ्यांना संस्कृत विषयाची गोडी लागावी म्हणून त्यांनी अध्यापनात वैविध्य व नेमकेपणा आणला, विद्यार्थ्यांना अधिकाधिक गुण मिळवून देणे, संस्कृत या विषयाची विद्यार्थी संख्या वाढविणे, आत्तापर्यंत शेकडो विद्यार्थ्यांना पान ३ वर

# वडवणीत डिजेमुक्त ऐतिहासिक शिवजन्मोत्सव सोहळा साजरा होणार

## संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांची उपस्थिती राहणार; सर्व जाती धर्मातील शिवप्रेमींनी शिवजयंती मिरवणुकीस मोठ्या संख्येने उपस्थित रहा

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवार दिनांक २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता भव्य दिव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेत शिवभक्त म्हणून संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांची उपस्थिती राहणार आहे. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा मेघडंबरी राजमहाल आकर्षक देखावा सादर करण्यात येणार आहे. तसेच मिरवणुकीमध्ये

कोल्हापूर,अकलुज येथील नामांकित विविध पथक कला सादर करणार असून ऐतिहासिक डिजेमुक्त सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा साजरा होणार असल्याची माहिती सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने बुधवार दि. २६ फेब्रुवारी रोजी पत्रकार परिषदेत दिली आहे.

यावाबत अधिक माहिती अशी की, वडवणी येथील सार्वजनिक



शिवजन्मोत्सव सोहळा २०२५ चे आयोजन करण्यात आले असून यामध्ये विविध सामाजिक, सांस्कृतीक, धार्मिक कार्यक्रमांचे भरगच्च आयोजन करण्यात आलेले आहे, शुक्रवार दि.२८ फेब्रुवारी २०२५ रोजी भव्य मिरवणुक दुपारी ४ ते सायंकाळी १० वाजेपर्यंत पार पडणार आहे. मिरवणूकीची सुरूवात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, जिवाजी महाले चौक, संविधान चौक, स्व.वसंतराव नाईक चौक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक,ते चाटे चौक येथे मिरवणुकीचे विसर्जन होणार आहे. या मिरवणुकीत कोल्हापूर येथील कलाकारांची प्रसिध्द पान ३ वर



**माजलगाव:– येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त (अण्णा) नरवडे यांचे भाचे शंभूराजे विजयकुमार भिल्लारे यांची यूपीएससी अंतर्गत एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना बाजार समितीचे सभापती जयदत्त (आण्णा) नरवडे समवेत देवानंद भाऊ शिंदे,डॉ.महेश नरवडे, सचिव हरिभाऊ सवणे, साह्यक सचिव रवींद्र नाईकनवरे,लेखापाल उद्धव फपाळ,एफ.एम.सय्यद,अअशोक माळी**

# ॲक्सीसचे महिनाभरापासून बंद असलेले एटीएम तात्काळ सुरू करा - मिलिंद सरपते

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील एक्सेसचे बँकेचे एटीएम मशिन गेल्या महिना भरापासून बंद असल्यामुळे शहरातील ग्राहकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. पैसे भरण्यासाठीचे सीडीएम मशीन सुद्धा बंद आणि एटीएम मशिन बंद असल्यामुळे ग्रामीण भागातील अनेक ग्राहकांना वेळेवर पैसे टाकता आले नाहीत व मिळाले नाहीत. त्यामुळे बँकेच्या ग्राहकांमध्ये नाराजी पसरली असून, ग्राहक तीव्र शब्दात निषेध करीत आहेत.

शहरातील शिवाजी महाराजांच्या चौक मुख्य एक्सेस सीडीएम व एटीएम कार्यरत होते. २५ दिवसांपासून ते अचानक बंद झाले. याबाबत ग्राहकांना बँकेकडून कोणतीही पूर्वसूचना दिली नव्हती किंवा एटीएम केंद्र किती दिवस बंद राहणार आहे, याबाबतची माहितीही दिली नव्हती. सना निमित्त ग्राहकांना पैशांची गरज असते. पैसे काढण्यासाठी दुसऱ्या बँकेच्या एटीएम मध्ये जावे लागले.आणि इतर बँकेच्या एटीएम मधून व्यवहार झाल्याने जास्तीचे शुल्क आकारले जाते. त्यामुळे ग्राहकांची नाराजी वाढत आहे. बँकेच्या शाखा व्यवस्थापकाची संपर्क केला असता दोन दिवसात प्रॉब्लेम सॉल करू असे सांगण्यात आले. तरी दोन दिवसात प्रॉब्लेम सॉल न झाल्यास एटीएमला टाळे लावण्यात येणार असल्याची मिलिंद सरपते यांनी इशारा दिला आहे.




**आष्टी येथील शनि मंदिर सभागृहात श्री. सुखलालजी मुथा आणि श्री. संजय मेहेर परिवारातर्फे गुरु प्रसाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. परम पूज्य गुरुदेव श्री. श्रुतमुनीजी म. सा. यांच्या प्रेरणेतून हा कार्यक्रम घेण्यात आला होता. या कार्यक्रमात सहभागी होत अन्नदान केले. तसेच प्रसादाचा लाभ घेतला. यावेळी सुनील शेठ मेहेर, नवनीत शेठ कटारिया, राजेंद्रजी जोशी, अनिलशेठ मेहेर, संतोष शेठ मेहेर, अतुलजी मेहेर, विजुशेठ बोगावत, नवीनजी कासवा, बाळू शेठ मेहेर, राहुलजी मुथा तसेच शहरातील जैन श्रावक संघाचे सदस्य व व्यापारी बांधव उपस्थित होते.**


# श्री गणपती मंदिर ट्रस्ट, चौभारा यांच्याकडून महाशिवरात्रीनिमित्त दीपोत्सव सोहळा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरातील श्री गणपती मंदिर ट्रस्ट, चौभारा यांच्याकडून महाशिवरात्रीनिमित्त सकलेश्वर मंदिर (बाराखांबी), अंबाजोगाई येथे मंगळवारी दीपोत्सव सोहळा हा उपक्रम राबविण्यात आला. यात सर्व भाविक भक्त मोठ्या उत्साहात सहभागी झाले. यावेळी उपस्थित सर्वांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

श्री गणपती मंदिर ट्रस्ट, चौभारा आणि अलंकार मित्र परिवार यांच्या वतीने मंगळवार, दिनांक २५





फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीनिमित्त दीपोत्सव सोहळा हा उपक्रम राबविण्यात आला. दीपोत्सवानिमित्त प्रज्वलित केलेल्या दिव्यांच्या रोषणाईने सकलेश्वर मंदिर (बाराखांबी) गाभारा व सभामंडप उजळून निघाले होते. या उपक्रमात ट्रस्टचे पदाधिकारी, अलंकार मित्र परिवाराचे सदस्य तसेच भाविक भक्त, महिला, युवक, युवती, ज्येष्ठ नागरिक आणि बाल गोपाळ मोठ्या उत्साहात सहभागी झाले. यानिमित्ताने महामृत्युंजय मंदिर, आद्यकवी मुकुंदराज समाधी परिसरात सर्व भाविक भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सतिश राऊत, भागवतराव देवशटवार, नंदकिशोर देशमाने, भिमाशंकर राऊत, प्रभाकर देशमाने, दयानंद दगडूराऊत, माऊली सातभाई, शंभुलिंग राऊत, संगम देवशटवार, दयानंद राऊत, बालाजी कोंडेकर, अमोल राऊत, राम वसंतराव घोडके, अतुल राऊत, सुहास सातभाई, शिवलिंग राऊत, शंकर सातभाई, नागेश्वर राऊत, संकेत झरकर, ओमकार धोत्रे, राहुल भावठाणकर, संदीप भावठाणकर, शुभम भावठाणकर, महेश राऊत, बालाजी राऊत, गोविंद राऊत, विलास जिरे, कृष्णा घोडके, संतोष घोडके, गजानन घोडके, अनंत घोडके, अभिजीत राऊत, अनिकेत राऊत, नितीन जिरे, योगेश कातळे, रमेश देशमाने, चंद्रकांत देशमाने, उमाकांत देशमाने, संदीप देशमाने, प्रसाद देशमाने, बाळकृष्ण देशमाने, विमलनाथ कोंडेकर, वैजनाथ जाधव, गणेश जाधव, विष्णू जाधव, पप्पू सातभाई, गजानन भावठाणकर, विशाल कंठीकर आदींसह गणेश भक्तांनी पुढाकार घेतला होता.



**माजलगाव;– महिला विषयी चुकीचे विधान करणाऱ्या खासदार संजय राऊत यांना माजलगाव शिवसेनेच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांच्या आदेशानुसार व युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जोडे मारो आंदोलन करताना शिवसेनाचे (शिंदे गट) शहराध्यक्ष धनंजय ( पापा ) सोळंके व शिवसैनिक**

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

शुक्रवार, दि.२८ फेब्रुवारी २०२५ । पान ७

# माळेगाव कारखाना निवडणूक

# दोन्ही पवारांचे पॅनल आमने-सामने येणार

**बारामती । प्रतिनिधी**

माळेगाव सहकारी साखर कारखाना निवडणूक राष्ट्रवादीचा शरदचंद्र पवार गट लढवणार की नाही, असा संभ-म खा. सुप्रिया सुळे यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे निर्माण झाला होता. परंतु, कारखाना निवडणुकीत पुन्हा एकदा काकांशी दोनहात करण्याची तयारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुतणे युगेंद्र पवार यांनी केली आहे. 'माळेगाव'च्या निवडणूक रिंगणात आम्ही उतरणार असल्याचे युगेंद्र पवार यांनी जाहीर केले आहे.





युगेंद्र पवार यांच्या भूमिकेमुळे विधानसभा निवडणुकीनंतर पुन्हा एकदा बारामतीत 'काका विरुद्ध पुतण्या' अशी लढत रंगणार असल्याचे चित्र तयार झाले आहे.

पत्रकारांशी बोलताना युगेंद्र पवार म्हणाले की, सहकारी साखर कारखान्याची निवडणूक ही पक्ष म्हणून लढवली जात नाही. माळेगाव सहकारी साखर कारखाना हा शरद पवारांचा कारखाना म्हणून देशात, राज्यात ओळखला जातो. शरद पवार या कारखान्याचे सभासद आहेत. शरद पवार यांनी या कारखान्याच्या भल्यासाठी आजवर अनेक निर्णय घेतले आहेत. माळेगाव कारखाना आणि तेथील संस्था या शरद पवार यांच्या प्रयत्नांतून उभ्या राहिलेल्या आहेत. या कारखान्याची निवडणूक लढविण्यासंदर्भात शेतकर्‍यांच्या मनात शंका आहेत. जर शेतकरी निवडणूक लढणार असतील, तर आम्ही त्यांच्या पाठीशी निश्चितपणे उभे राहणार आहोत. अजून कारखान्याची निवडणूक जाहीर होते आहे. गेल्या काही वर्षांत कारखान्याच्या निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर कारखाना ज्या वेळेस निवडणुकीची तारीख निश्चित होईल, त्या वेळेस या विषयावर आपण निश्चित बोलू. मात्र, शेतकरी निवडणुकीसाठी तयार असतील, ते साथ देण्यास तयार असतील तर आम्ही पूर्ण ताकद त्या ठिकाणी लावणार आहोत.

सध्या माळेगाव कारखान्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विचाराचे संचालक मंडळ कार्यरत आहे. तालुक्यातील माळेगाव व सोमेश्वर ही दोन्ही साखर कारखाने व अन्य मोठ्या सहकारी संस्था अजित पवार यांच्या एकछत्री अमलाखाली आहेत. तेथे शरद पवार गटाला ते प्रवेश करू देतील का? हा प्रश्नच आहे.

'माळेगाव'बाबत सहकारातील ज्येष्ठ नेते चंद्रराव तावरे, माजी अध्यक्ष रंजनकुमार तावरे या गुरू-शिष्यांनीही अद्याप आपली भूमिका जाहीर केलेली नाही. परंतु, नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत महायुती म्हणून ही मंडळी अजित पवार यांच्यासोबत राहिलेली आहे.

## सामायिक शेती आणि शेवग्याच्या शेंगाचा वाद सख्ख्या भावाचा भाऊ, पुतण्यांकडून खून

**मंचर । प्रतिनिधी**

शेवग्याच्या शेंगा तोडण्याच्या कारणावरून तसेच जमिनीच्या वादातून सख्ख्या भावाने व त्यांच्या मुलांनी भावाला मारहाण करत त्याचा खून केल्याची धक्कादायक घटना महाळुंगे पडवळ येथे बुधवारी (दि. २६) सकाळी घडली. चंद्रकांत सदाशिव चासकर (वय ६९, रा. महाळुंगे पडवळ, ता. आंबेगाव) असे खून झालेल्या भावाचे नाव आहे.



याप्रकरणी चंद्रकांत यांचे भाऊ सुभाष सदाशिव चासकर, सुभाष यांची पत्नी मंदा, मुलगे सचिन आणि नितीन उर्फ दत्ता चासकर यांच्या विरोधात मंचर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला असून त्यांना अटक करण्यात आहे. मयत चंद्रकांत चासकर यांचा मुलगा किरण चंद्रकांत चासकर यांनी मंचर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असल्याची माहिती पोलिस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांनी दिली.

महाळुंगे पडवळ येथील चंद्रकांत चासकर व सुभाष चासकर यांच्या सामायिक शेत जमिनीची वाटणी अद्याप झालेली नाही. या शेतजमिनीवरून चंद्रकांत चासकर व त्यांचा भाऊ सुभाष चासकर यांच्यामध्ये वाद सुरू होता. मंगळवारी (दि. २५) सायंकाळी चंद्रकांत चासकर, पत्नी नंदा चासकर, सून रूपाली चासकर तसेच किरण चासकर हे शेतातील शेवग्याच्या शेंगा आणण्यासाठी गेले होते. त्यावेळी सुभाष चासकर याने शिवीगाळ, दमदाटी करत रूपाली चासकर यांच्या हातातील शेवग्याच्या शेंगा ओढून घेतल्या. किरण चासकर यांनी विचारणा केली असता पुण्यावरून मुलांना बोलावून घेऊन तुमच्याकडे बघतो, अशी धमकी सुभाष चासकर याने दिली. त्यानंतर बुधवारी (दि. २६) सकाळी ८ वाजता चंद्रकांत चासकर यांच्या घरासमोर त्यांचे भाऊ सुभाष, त्यांची पत्नी मंदा, मुलगे सचिन आणि नितीन हे सर्वजण आले. शिवीगाळ, दमदाटी करून त्यांनी चंद्रकांत चासकर यांना धक्का देऊन जमिनीवर पाडले. त्यानंतर चौघांनीही त्यांना लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. सुभाष हे चंद्रकांत यांच्या छातीवर बसून त्यांना ठोसे मारत होते. त्यावेळी मंदा यांनी पाय धरले होते, तर सचिन व नितीन हे लाथा-बुक्क्यांनी मारहाण करत होते. वडिलांना वाचवण्यासाठी किरण पुढे आले असता त्यांनाही मारहाण करण्यात आली. या मारहाणीत गंभीर जखमी होऊन चंद्रकांत चासकर हे बेशुद्ध पडले. त्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात नेण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. यासंदर्भात किरण चासकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी सुभाष चासकर, मंदा चासकर, सचिन चासकर, नितीन उर्फ दत्ता चासकर यांच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करीत त्यांना अटक करण्यात आली.

## स्वारगेट प्रकरणातील आरोपी सापडेना; २५ एकर शेताची पाहणी करून पोलिसांचे पथक परतले

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील स्वारगेट बसस्थानकात एका शिवशाही बसमध्ये तरुणीवर बलात्कार करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेने राज्यभरात खळबळ उडाली आहे. दत्तात्रय गाडे असे नराधमाचे नाव आहे. हा आरोपी पुणे जिल्ह्यातल्या शिरूर तालुक्यातील गुनाट गावचा रहिवाशी असून पोलिसांना या आरोपीसंदर्भात मोठी माहिती हाती लागली होती. आरोपी काल रात्री पुण्यातील गुनाट गावात आल्याची माहिती समोर आली.



गुनाट गावातील घरात आरोपी दत्तात्रय गाडेने पाणी मागितले, अशी माहिती पुण्यातील शिरूर येथील गुनाट गावातील गावकर्‍यांनी दिली. गुनाट गावातील गावकर्‍यांकडून मिळालेल्या या माहितीनंतर पोलिसांकडून गुनाट गावात आरोपीचा कसून शोध घेण्याची मोहीम सुरू झाली. पोलिसांचा फौजफाटा गुनाट गावात दाखल झाला. गावात असणाऱ्या ऊसाच्या शेतामध्ये ड्रोन आणि डॉग स्कॉडच्या मदतीने आरोपीचा घेण्यात आला. मात्र दिवसभर पोलिसांनी सर्व परिसर पालथा घातला मात्र आरोपीचा शोध लागला नाही. दरम्यान, गुनाट गावातील आरोपी दत्ता गाडेला शोधण्याची आजच्या दिवसाची शोध मोहीम थांबविण्यात आली आहे. उद्या सकाळपासून पुन्हा शोध मोहिमेला सुरुवात होणार आहे. पुणे पोलिसांनी ग्रामस्थांना देखील रात्रीच्या वेळी आरोपी दिसला तर कळवण्याचे आहवान केले आहे.

२५ एकर परिसरात केली पाहणी

दत्ता गाडेला शोधण्यासाठी गेलेल्या पोलिसांनी गुनाट गावच्या परिसरातील गाडे ज्या शेतात असल्याची माहिती मिळाली होती तेथील २५ एकर परिसरातील शेतशिवाराची पहाणी केली. मात्र तरीही दत्ता गाडेचा शोध लागला नसल्याने शोध पथकाला परत येण्याच्या सुचना देण्यात आले आहे. परिसरात बिबट्याचा वावर असल्याने भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे रात्रीची शोधमोहिम थांबविण्यात आली आहे.


दत्तात्रय गाडेवर १ लाखाचे बक्षीस -

फरार आरोपी दत्तात्रय गाडेला पकडण्यासाठी पोलिसांनी १ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. नागरिकांनी कुठल्याही संशयित हालचाली आढळल्यास स्वारगेट पोलिस ठाण्याशी किंवा १०० क्रमांकावर संपर्क साधावा, अशा सूचनाही देण्यात आली आहे. आरोपीबद्दल माहिती सांगणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल, असेही पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. आरोपीचा शोध घेण्यासाठी विविध ठिकाणी छापे टाकण्यात येत असून, लवकरच त्याला अटक केली जाईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

## जन्मदात्या आईलाच केली मारहाण, नंतर खोटा दावाही केला

**पुणे । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या पक्षाच्या पदाधिकाऱ्याचे पितळ त्याच्या आईनेच उघड केलं आहे. आपण जन्मदात्या आईला मारहाण केली नाही असा दावा त्याने केला होता. तो दावा त्याच्या आईनेच खोडून काढला असून पोटच्या मुलाने काय काय गुण उधळले हे त्या माऊलीने सांगितलं. मारुती देशमुख असं त्या पदाधिकाऱ्यांच नाव असून तो मावळ तालुका राष्ट्रवादी ओबीसी सेलचा अध्यक्ष आहे.



मारुती देशमुखचा दावा काय होता?

आपण आईला मारल्याचा बनाव रचत पुण्यात राहणारा लहान भाऊ राजेंद्र देशमुखने खोटा गुन्हा दाखल केल्याचा दावा मारुती देशमुखने केला होता. त्यावेळी आईच्या अंगावरील कायमस्वरूपी असणारे व्रण दाखवले, प्रत्यक्षात तिला कोणी मारहाण केलीच नाही. मला अजितदादांनी पद दिलं म्हणून मला बदनाम करण्याचा हा डाव आहे. उलट आमदार सुनील शेळकेंचा माझ्यावर विश्वास आहे असा दावा मारुती देशमुखने केला होता.

आईच समोर आली

मारुती देशमुखने दावा केल्यानंतर त्याची आईच स्वतः माध्यमांसमोर आली आणि तिने त्याचं पितळ उघड केलं. मारुती देशमुखने आणि त्याच्या बायकोने आपल्याला मारहाण केली. लाकडी दांड्याने आपल्या पाठीत मारलं. या आधीही त्याने आणि त्याच्या बायकोने आपल्याला मारहाण केली आहे. फक्त त्याची बदनामी नको म्हणून मी काही बोलले नाही असं त्याच्या आईने सांगितलं.

पोटच्या मुलाची अब्रू वाचवण्यासाठी मी मूळगावी आले. पण मुलाने मात्र माझा मानसिक आणि शारीरिक छळ केला असा आरोप जन्मदात्या आईने पोटच्या मुलावर केला. या प्रकरणी पोलिसांमध्ये तक्रार केल्याची माहितीही त्यांनी दिली.

कार्ला येथील आई एकविरा देवी ट्रस्टचे उपाध्यक्ष पदही मारुती देशमुखांकडे आहे. मात्र स्वतःच्या आईवर ते अन्याय करत असल्यानं चहुबाजूंनी त्यांच्यावर टीकेची झोड उठत आहे. खरं तर अजित पवारांनी त्यांच्या पदाधिकाऱ्यांना या आधीही तंबी दिली आहे. चुकीचं काही खपवून घेतलं जाणार नाही असा जाहीर दमही दादांनी अनेकदा दिला आहे. आता त्यांच्या माळवच्या पदाधिकाऱ्याकडून अशा प्रकारचे गैरकृत्य समोर आलं आहे. मारुती देशमुखांवर अजित दादांनी करावी अशी मागणी त्यांचे बंधू राजेंद्र देशमुख यांनी केली आहे. त्यामुळं आता अजित पवार कठोर पावलं उचलत मारुती देशमुखांची पक्षातून हकालपट्टी करतात का? याकडे सर्वांचं लक्ष लागून आहे.

## दोन सराईत गुन्हेगार पुणे जिल्ह्यातून तडीपार; नांदेडसिटी पोलिसांची मोठी कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून गुन्हेगारीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता एक मोठी बातमी समोर आली आहे. नव्याने सुरू झालेल्या नांदेडसिटी पोलिसांनी हद्दीत कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना शहर व जिल्ह्यातून तडीपार केले आहे आहे. एकाला बीड येथे सहा महिन्यांसाठी तर दुसऱ्याला अहिल्यानगर येथे दोन वर्षांसाठी तडीपार केले असल्याची माहिती वरिष्ठ निरीक्षक अतुल भोस यांनी दिली. परिमंडळ तीनचे उपायुक्त संभाजी कदम यांनी या तडीपारीचे आदेश दिले आहेत. रोहित रमेश राठोड (वय २१) तसेच अथर्व रतन दोडके (वय २०) असे तडीपार करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत.



ही कारवाई वरिष्ठ निरीक्षक अतुल भोस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस शिपाई प्रथमेश गुरव, विजय वीरनक व तांबे यांनी केली आहे. रोहित हा पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. त्याच्यावर खूनाचा प्रयत्न, वाहन तोडफोड असे तीन गुन्हे दाखल आहेत. तर, अथर्व याच्यावर दोन गुन्हे दाखल असून, त्यात दुखापत व खूनाचा प्रयत्नाचा गुन्हा नोंद आहे. दरम्यान, त्यांची भागात दहशत होती. त्यांच्यामुळे परिसरात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता निर्माण होती. त्यामुळे त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचा तसेच त्यांना शहर व जिल्ह्यातून तडीपार करण्याचा प्रस्ताव वरिष्ठ निरीक्षक अतुल भोस यांनी तयार केला होता. तो प्रस्ताव परिमंडळ तीनचे उपायुक्त संभाजी कदम यांच्याकडे पाठविला होता. त्यानूसार, त्यांना तडीपार करण्यात आले आहे.

## वृक्ष लागवड आणि रक्तदान वाचवी मनुष्य जातीचे प्राण - शोभाताई आर धारिवाल

**पुणे । प्रतिनिधी**

दरवर्षी १ मार्च रोजी श्री रसिकलाल मा. धारीवाल यांच्या जन्मदिनानिमित्त रक्तदान सोहळा आयोजित केला जातो. या आधीही त्यांच्या जन्मदिनानिमित्त पुण्यामध्ये विविध रक्तदान केंद्रांवर एकाच दिवशी २४,००० ब्लड बॅग्स संकलन करण्याचा विक्रम आर एम डी फाउंडेशनने केलेला आहे, हि परंपरा आजही नियमितपणे पाळली जाते.

तसेच आर एम डी फाउंडेशन द्वारा मागील ३० वर्षांपासून वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन कार्यक्रम निरंतर चालू आहे श्री रसिकलाल धारीवाल साहेब यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त एक लाख झाडं लावण्याची योजना असेल किंवा पुलकछाया योजने अंतर्गत भारतभर वृक्ष लागवड असेल किंवा एक झाड आईच्या नावाने योजना असेल तेव्हा आर एम डी फाउंडेशन द्वारा शेकडो वृक्ष लागवड व संवर्धन कार्यक्रम राबविण्यात आलेले आहे.काळाच्या बदलत्या गरजेनुसार फाउंडेशनने ट्री ट्रान्सप्लांटेशन योजना राबविण्यात सुरुवात केलेली असून पुणे रिंग रोड प्रकल्पात शेकडो वृक्षांना कापण्यापासून वाचवून उपलब्ध जागेत स्थानांतर करून अनेक वृक्षांचे प्राण वाचविण्याचे काम सुरु झालेले आहे. आजच्या प्रसंगी वृक्ष लागवड आणि रक्तदान वाचवी मानवाचे प्राण अशी भावना शोभाताई रसिकलाल धारिवाल यांनी व्यक्त केली.

## पुण्यातील स्वारगेट प्रकरणाने 'निर्भया'ची आठवण, माजी सरन्यायाधीश चंद्रचूड यांची कडक कारवाईची मागणी, आरोपी अद्याप फरार

**पुण्यातील स्वारगेट प्रकरणाने 'निर्भया'ची आठवण, माजी सरन्यायाधीश चंद्रचूड यांची कडक कारवाईची मागणी**

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे येथील स्वारगेट आगारात बसमध्ये २६ वर्षीय तरूणीवर झालेल्या कथित लैंगिक अत्याचाराच्या तपासादरम्यान, फरार आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. भारताचे माजी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनीही अशीच मागणी केली आहे. २०१२ च्या दिल्ली निर्भया सामूहिक लैंगिक अत्याचाराशी या घटनेची तुलना करणाऱ्या विरोधकांच्या वाढत्या दबावादरम्यान, हे प्रकरण सोडवण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत. फरार आरोपींची माहिती देणाऱ्याला पोलिसांनी एक लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे.



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एमएसआरटीसी) बसमध्ये पुणे स्वारगेट आगारात मंगळवारी सकाळी घडलेल्या घटनेनंतर फरार असलेला आरोपी दत्तात्रेय रामदास गाडे (३७) याला पकडण्यासाठी पोलिसांनी अनेक पथके तयार केली आहेत. माजी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी गुरुवारी सांगितले की, 'निर्भया' घटनेनंतर कायद्यांमध्ये बरेच बदल करण्यात आले, मात्र केवळ कायदे करून अशा घटना थांबवता येणार नाहीत. समाजावर मोठी जबाबदारी असून त्याशिवाय कायद्यांची कडक अंमलबजावणी झाली पाहिजे.

महिलांसाठी केलेल्या कायद्यांची योग्य अंमलबजावणी झाली पाहिजे, असे चंद्रचूड म्हणाले. महिला जिथे जातील तिथे सुरक्षित वाटले पाहिजे. अशा प्रकरणांमध्ये योग्य तपास, कठोर कारवाई, जलद सुनावणी आणि शिक्षा होणे आवश्यक आहे. कायदा आणि सुव्यवस्था आणि पोलिसांवर मोठी जबाबदारी आहे. दरम्यान, आरोपी अद्याप फरार असून त्याला सोडले जाणार नसल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले आहे.

## वल्लभनगर आगारात पोलिसांसोबत महिला कार्यकर्त्यां धडकल्या

**पिंपरी । प्रतिनिधी**

पुण्यातील स्वारगेट स्थानकावरील घडलेल्या घटनेनंतर पिंपरी चिंचवड शहरातील आगाराची सुरक्षितता वाढवावी, या मागणीसाठी शहरातील महिला कार्यकर्त्या आणि पोलीस प्रशासनाने वल्लभनगर आगाराची भेट घेतली. दरम्यान, सुरक्षा व्यवस्था सक्षम करावी, पोलीस नियंत्रण स्थापन करावा, हेल्पलाइन व पोलीस स्थानकाचे नंबर दर्शनी भागात लावावे, आगारातील देखभाल विभाग परिसरात स्थानिकांना मज्जाव करण्यात यावा, आगारात थांबलेले रिक्षा चालक आणि वाहनधारकांचे मोबाईल क्रमांक घ्यावेत, यासह महिलांच्या सुरक्षिततेसाठी आगाराने पुढाकार घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.



शहरातील या एकमेव आगाराची 'दै. पुढारी'च्या प्रतिनिधीने पाहणी केल्यानंतर सुरक्षा व्यवस्था ढिसाळ असल्याचे दिसून आले. तसेच मद्यपी आणि सीसीटीव्ही यंत्रणेचा अभाव दिसला. दरम्यान, याबाबतच्या 'दै. पुढारी'त आलेल्या वृत्तानंतर पोलीस प्रशासन खडबडून जागे झाले. त्यांनी तत्काळ एसटी आगारातील प्रशासनाशी चर्चा करून पोलीस गस्त वाढवण्याबाबत आश्वासन दिले. त्याचप्रमाणे शहरातील राजकीय महिला पदाधिकारी, सामाजिक महिला कार्यकर्त्यांनी या ठिकाणी आगार प्रमुखांची भेट घेऊन सुरक्षा संबंधित उपाययोजना करण्याची मागणी केली.

दरम्यान, महिला संपर्क क्रमांक अथवा स्थानिक पोलीस ठाण्याचे क्रमांक दर्शनी भागात लावण्यात यावेत, जिल्ह्याच्या वेगवेगळ्या भागातून येणाऱ्या एसटी मधील वाहक व चालकांची नोंद पुस्तक यामध्ये माहिती समाविष्ट करावी. त्या वाहक व चालकांनी आगारात असलेल्या विश्रामगृहातच थांबावे. या ठिकाणी असलेला हिरकणी कक्षाची देखभाल दुरुस्ती करावी. त्यासोबतच एसटी परिसर मोठा असल्याने या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था आणखीन वाढवण्यात यावी. त्याचप्रमाणे पुरेशा प्रमाणात वीज व्यवस्था देखील करण्यात यावी.

यावेळी एसटी आगाराचे प्रमुख बालाजी सूर्यवंशी, सहाय्यक वाहतूक अधीक्षक वैशाली कांबळे, संत तुकाराम पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोरख कुंभार, माजी नगरसेविका सुजाता पलांडे, भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चा पदाधिकारी, युवा मोर्चाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## हत्यारांचा धाक दाखवून नागरिकांची लूट; आरोपींना पोलीसांनी ठोकल्या बेड्या

**पिंपरी । प्रतिनिधी**

दिघी, आंळदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत चऱ्होली परिसरात पहाटे मॉर्निंग वॉक करणाऱ्या नागरिकांना हत्याराचा धाक दाखवून लुटणाऱ्या सराईत दोन आरोपींना गुन्हे शाखेने ७२ तासात अटक केली आहे. त्या आरोपींकडून १२ जबरी चोरीचे तसेच एक वाहन चोरीचा गुन्हा देखील उघडकीस आला आहे. यव्हाण भास्कर कासार (वय२४, रा. सणसवाडी, पुणे) आणि विश्वजीत अर्जुन पवार (वय२३, रा. मुकुंदवाडी, संभाजीनगर) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.



पिंपरी चिंचवड गुन्हे शाखेचे पोलीस उप आयुक्त संदीप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, दिघी-आंळदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिनांक २१ आणि २२ फेब्रुवारी रोजी आरोपींनी नागरिकांना चाकूचा धाक दाखवून मौल्यवान वस्तु जबरीने हिसकावून नेल्या होत्या. या घटनेबाबत तात्काळ दिघी पोलीस व आळंदी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले होते.

आरोपी विश्वजीत अर्जुन पवार हा जालना जिल्ह्यात चार गुन्ह्यात वॉन्टेड होता.

ही कामगिरी मालमता गुन्हे विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ, गुन्हे शाखा युनिट ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जिंतेद्र कदम, खंडणी विरोधी पथकांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देंवेद्र चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक सुनिल भदाणे, पोलीस उपनिरीक्षक भरत गोसावी, मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाकडील पोलीस हवालदार मोरे, गडदे, पोलीस नाईक कोकणे, पोलीस शिपाई कदम, आत्तार, खंडणी विरोधी पथकाकडील सहायक पोलीस फौजदार कानगुडे, पोलीस हवालदार जाधव, पोटे, गोडांबे, गुन्हे शाखा युनिट-०३ कडील पोलीस हवालदार सोनवणे, साबळे, पोलीस शिपाई राळे, तांत्रिक विशलेषण विभागाचे पोलीस हवालदार ननावरे यांनी केली आहे.